
ISSN (Print) : Applied...

जीवन शिक्षण
मार्च २०२३
किंमत रु. ३०/-
पृष्ठे ४४ वर्ष : ६७
अंक : १२ पुणे.

Jeevan Shikshan
March 2023
Price ₹30
Pages 44 Vol. : 67
Issue : 12 Pune.

# जीवन शिक्षण



## जागतिक महिला दिन
## ८ मार्च

तुझ्या उत्तुंग भरारी पुढे
गगनही ठेंगणे भासावे,
तुझ्या विशाल पंखाखाली
विश्व हे सारे वसावे.

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी एक क्रांतिज्योत!!!
शिक्षणाची प्रणेती, विद्येची जननी,
ज्ञानदान करणारी सरस्वती

क्रांतिज्योती **सावित्रीबाई फुले**

यांना स्मृतिदिनानिमित्त
**विनम्र अभिवादन!**

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**वर्ष ६७ मार्च, २०२३ अंक १२ वा**



❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.) **अध्यक्ष**
संचालक तथा संपादक

**रमाकांत काठमोरे,** **कार्यकारी संपादक**
सहसंचालक

**डॉ. नेहा बेलसरे** **सहसंपादक**
प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि
सा. शास्त्रे व कला-क्रीडा

**डॉ. कमलादेवी आवटे,** **सदस्य**
प्राचार्य, भाषा आणि समन्वय

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. **सदस्य**

**ज्योती उपाशी,** प्र. सहा. संचालक, लेखा **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता **सदस्य**

❖ **अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा **सदस्य सचिव**
विभागप्रमुख प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू विभाग

❖ **निर्मिती सहायक :**
**सलिल वाघमारे,** अधीक्षक, प्रसारमाध्यम
**अरुण जाधव,** अधिव्याख्याता, प्रसारमाध्यम व सी.पी.डी. विभाग

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी, श्रीकांत चौगुले



❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** ५७,२५०/-

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ असा शिकवला पाठ | सचिन चांदणे | ५ |
| ❖ स्नेहसंमेलने : व्यक्तिमत्त्व विकासाचे व्यासपीठ | पोपट धामणे | ८ |
| ❖ भारतातील स्त्री-शिक्षणाची वाटचाल | धम्मरत्न वायवळ | १० |
| ❖ मुलांनीच लिहिते ठेवले मला... | एकनाथ आव्हाड | १५ |
| ❖ मुले अनुकरणप्रिय असतात... | माधुरी पाटील | २१ |
| ❖ शालेय मंत्रिमंडळ : समूह संस्कारांचा एक मार्ग | रामचंद्र पाटील | २३ |
| ❖ आपल्या राष्ट्रपती : मा. श्रीम. द्रौपदी मुर्मूजी | वृंदा शिंदे | २६ |
| ❖ गोष्टींची शाळा | बालाजी जाधव | २८ |
| ❖ रफारापूर्वीच्या व रफारयुक्त अक्षरांचे इकार-उकार | सलिल वाघमारे | ३० |
| ❖ हिवाळी शाळा : एक विद्यापीठ | डॉ. विजय बागुल | ३४ |
| ❖ मी राबवलेला उपक्रम 'सांगा सांगा सांगा' | श्रीनिवास मोरे | ३८ |
| ❖ मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या योजना (क्रमश:) | डॉ. द. वि. चिक्करमने | ४० |
| ❖ इतिहासाच्या पानांवरुन | श्रीकांत चौगुले | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....✍



मित्रांनो,

कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात स्वतःपासून करणे आवश्यक आहे. मुले अनुकरणातून शिकत असतात. ती आपल्या पालकांचे, समाजाचे आणि विशेषतः शिक्षकांचे अनुकरण करत करत जीवनाचे धडे गिरवत असतात. आपण सर्वांनी आपल्या वागण्यातून मुलांवर सुसंस्कार करणे गरजेचे आहे. शिक्षकांवरील ही जबाबदारी तर आणखी वाढते. वैयक्तिक स्वच्छता, चारित्र्य, शिस्त, विज्ञाननिष्ठा, समता, प्राणिमात्रांविषयी कणव, पर्यावरणविषयक जागृती इत्यादी बाबी शिकवण्यापेक्षा आपल्या वागण्यातून मुलांसमोर आदर्श ठेवणे गरजेचे आहे. मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच निसर्गातील विविध चमत्कार व त्यांमागील विज्ञान अनुभवायला शिकवले पाहिजे. मुलांना झाडे, वेली, फुले, पक्षी, प्राणी यांच्यात रमता आले पाहिजे. त्यांना झाडावर चढणे, पोहणे, धावणे, उड्या मारणे, विविध खेळ खेळणे अशा जीवनाशी निगडित गोष्टी यायला हव्यात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कितीही भौतिक सुधारणा झाल्या, तरी शारीरिक क्षमता अतिशय महत्त्वाची आहे. या दृष्टीने पालकांनी व शिक्षकांनी मुलांना सुट्टीमध्ये विविध जीवन कौशल्ये शिकण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

मार्च, २०२३ च्या अंकात, प्रयोगशील शिक्षकांनी शाळांमध्ये राबवलेल्या उपक्रमांवरील विविध लेख, जागतिक महिला दिनानिमित्त भारतातील स्त्री–शिक्षणाची वाटचाल व मा. राष्ट्रपती श्रीम. द्रौपदी मुर्मूजी यांच्या जीवनावरील लेख, मराठी शुद्धलेखनावरील लेख, इतिहासाच्या पानांवरून अशा विविध विषयांवरील लेखांचा समावेश केलेला आहे. हे सर्वच लेख अभ्यासपूर्ण व वाचनीय आहेत, ते आपणांस नक्कीच आवडतील असा मला विश्वास आहे.

८ मार्च, जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना हार्दिक शुभेच्छा! आपण आपल्या कार्यक्षमतेच्या व आत्मविश्वासाच्या जोरावर जीवनातील सर्व क्षेत्रे पादाक्रांत करावीत अशा शुभेच्छा! तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मी सर्वच महिलांप्रति आदरभाव व्यक्त करतो. आपण मुलांमध्ये लहानपणापासूनच स्त्री–पुरुष समानतेची मूल्ये रुजवण्याचा संकल्प करू या.

१० मार्च, स्त्री–शिक्षणाच्या प्रणेत्या, ज्यांनी आपले संपूर्ण जीवन, सर्व स्तरांतील स्त्रियांच्या शिक्षणासाठी व्यतीत केले; अशा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

१२ मार्च, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, यशवंतराव चव्हाण यांना जन्मदिनानिमित्त आदरांजली.

२३ मार्च, शहीद दिनानिमित्त भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्वच ज्ञात–अज्ञात क्रांतिकारकांना विनम्र अभिवादन.

सर्व विद्यार्थ्यांना येणाऱ्या वार्षिक परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा!

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
तथा
संपादक, जीवन शिक्षण

# असा शिकवला पाठ

**सचिन चांदणे**
जि. प्र. प्राथ. शाळा कोकाटेवस्ती (मोहा)
ता. कळंब, जि. उस्मानाबाद.
भ्रमणध्वनी : ९९२२२५३३८९

*अध्यापनात रंजकता असली, की ते विद्यार्थ्यांना भावते, त्यांना आवडते व लक्षात राहते. याकरिता शिक्षकांनी विविध पद्धतींनी पाठ रंजक करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. 'फुलांचे संमेलन' हा पाठ शिकवताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिसरात मिळणारी फुले गोळा करून आणावयास सांगितले. त्यामुळे परिसरातील अनेक फुले जमा झाली. त्यांची नावे, रंग, सुवास इत्यादींची माहिती झाली. तसेच विद्यार्थी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत स्वतः सहभागी झाल्यामुळे त्यांना शिकण्याचा जो आनंद मिळाला तो अवर्णनीय आहे. या अभिनव प्रयोगाची माहिती या लेखात वाचायला मिळेल.*

*अशा अभिनव प्रयोगांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण आनंददायी वाटेल, त्यांची शिक्षणातील गोडी वाढेल, उपस्थिती वाढेल हे नक्की.*

इयत्ता दुसरीच्या बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील भाषा विषयातील 'फुलांचे संमेलन!' हा एक सुंदर पाठ, सर्जनशील आणि बालमनाचा चांगला अभ्यास असणारे बालसाहित्यिक बाळकृष्ण बाचल यांनी लिहिला आहे. पाठाची तयारी करत असताना यातील संकल्पना खूप आवडली. मग काय हा पाठ अगदी नावीन्यपूर्ण पद्धतीने घेण्याचा विचार सुरू झाला आणि मी कामाला लागलो. खूप मोजकेच असे धडे आपणास नवनिर्मितीची आणि सर्जनशीलतेची संधी देतात. त्यांपैकीच हा एक मला आवडलेला पाठ. हा पाठ शिकवताना आपणही आपले वय विसरून अगदी बालवयात हरवून जातो आणि खूप काही नवीन शिकतो. माझ्या मनातली कल्पना मी सहशिक्षकांना सांगितली. ही कल्पना त्यांनाही खूप आवडली आणि त्यांनी सुंदर नियोजन करण्याचे ठरवले. विद्यार्थ्यांना सांगितले, की आपण उद्या फुलांचे संमेलन घेणार आहोत. उद्या येताना प्रत्येकाने आपापल्या परिसरातील किमान दहा प्रकारची फुले आणावीत, त्याचबरोबर फुलांची नावे आणि माहितीही आणावी. उद्या येताना आपल्या आईबाबांना पण शाळेच्यावतीने शाळेत यायचे निमंत्रण द्यायला विसरू नका, असा निरोपही दिला आणि आमची शाळा सुटली.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच मुलांची खूप घाई-गडबड दिसू लागली. आज जो तो नेहमीच्या वेळेपेक्षा थोडा लवकर शाळेला आला होता. सुंदर नटलेले आणि बोलके, उत्साही चेहरे खूपच टवटवीत दिसत होते. मुली तर काय, खूपच छान दिसत होत्या. एखाद्या लग्नसमारंभात नटतात तशा नटून आल्या होत्या. मुलेही खूप ऐटबाज दिसत होती. प्रत्येकाच्या मनात एक उत्सुकता होती, कारण त्यांना आज आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला उपस्थित राहायचे होते; जो कार्यक्रम त्यांनीच सर्वांसाठी आयोजित केला होता. कार्यक्रमाचे आयोजक सर्वस्वी अगदी तेच होते.

शाळेत, व्हरांड्यात सर्वांची एकच लगबग चालू होती. रंगीबेरंगी कपडे घालून आलेली मुले शाळेचा परिसर अधिकच सुंदर बनवीत होती. आज दप्तर आणि जेवणाच्या डब्याबरोबर प्रत्येकाने विविध प्रकारची फुले शाळेत आणली होती. सुगंधी तसेच वास न येणारी, औषधी तसेच विषारीही. विविध रंगांची, विविध आकारांची फुले पाहून मन हरखून गेले.

मुलांनी हळुवार आणि व्यवस्थितपणे विविध प्रकारची फुले आणली होती. कोणी पिशवीत, तर कोणी टोपलीत फुले घेऊन आले होते. कोणी कोणी तर ओल्या कापडामध्ये फुले बांधून आणली होती. सर्वत्र फुलांचा सुगंध दरवळत होता. आम्ही एक दिवस अगोदरच वर्गखोल्या आणि शाळेचा परिसर छान स्वच्छ करून घेतला होता.

मंगळवार, दि. १० जानेवारी, २०२३ रोजी सकाळी जि. प. प्राथमिक शाळा कोकाटेवस्ती, मोहा येथे एका अनोख्या संमेलनाची तयारी सुरू झाली. सर्वांना अगोदरच निरोप पाठवले गेले होते. म्युझिक सिस्टिमवर वाजणारे संगीत सर्वांना मंत्रमुग्ध करत होते. अकरा वाजता कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जि. प. सदस्य, उस्मानाबाद तसेच उपसरपंच, मोहा यांची विशेष उपस्थिती होती. शासकीय नियमाप्रमाणे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे सर्व मान्यवरांच्या हस्ते पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. खऱ्या अर्थाने या संमेलनाला प्रेरणा मिळाली होती; ती 'फुलांचे संमेलन' या पाठातून! म्हणून आवर्जून सुरुवातीलाच पाठाचे लेखक श्री. बाळकृष्ण बाचल यांच्याशी आम्ही सर्वांनी मोबाईलवर संपर्क साधला. त्यांच्याशी गप्पा मारल्या. या सुंदर कल्पनेबद्दल त्यांचे आभार मानले आणि पुढील लिखाणासाठी शुभेच्छा दिल्या. मग मात्र आम्ही आमच्या संमेलनाकडे वळलो.



'फुलांचे संमेलन' या पाठात, एके दिवशी बागेतील सुंदर फुलांनी एक आगळावेगळा कार्यक्रम घेण्याचे ठरवले होते. त्यांनी शाळेतील त्या गोड मुलांकडे पाहून म्हणा किंवा बागेत येऊन शांत आणि मुग्ध होऊन तासन्तास बसून आणि काहीतरी कविता किंवा लेख अथवा कथा लिहिणाऱ्या साहित्यिकांकडे पाहून आपलेही एक संमेलन घेण्याचा निर्णय घेतलेला असावा. मुळात हे एक गोड स्वप्न आहे, अनन्या या मुलीचे! फुलांना काही हिंडता-फिरता येत नाही. मात्र त्यांचे नानाविध रंग जगण्याचे गोड गुपित सहज सांगून जातात. मानवाच्या आयुष्यातदेखील असेच सुख-दुःख, यश-अपयशरूपी विविध रंग असतात. असे असले तरी हे आयुष्य प्रत्येकाने फुलांसारखे आनंदात जगले पाहिजे. प्रत्येकाला कायम मदतीचा हात दिला पाहिजे असा अनमोल संदेश लेखक देऊ इच्छितात.

अनन्याला गोड स्वप्नात हे फुलांचे संमेलन दिसते. एखाद्या सुंदर कार्यक्रमातील आपल्या सर्वांच्या धावपळीसारखी जाई-जुई, कर्दळ यांचीसुद्धा किती धावपळ असेल. झेंडू, कण्हेर आणि जास्वंदी आनंदी कसे दिसत असतील? हिरवा, पांढरा चाफा कसे

असतील? मोगऱ्याचा काय रुबाब असेल? कमळाचे तर विचारायचेच नाही, ते तर काय स्वागतासाठी दाराशीच उभे असेल! निशिगंधाचा सुगंध न्यारा, तो सर्वांचे मन मोहून टाकत असेल. फुले आहेत म्हटल्यावर फुलपाखरे तर येणारच! एकाच ठिकाणी इतकी सुंदर आणि गोड फुले पाहून ती आनंदाने नाचत सुटली असतील. सदाफुली गाणे गात असेल, गुलाब राजा असल्याने त्याचा काही थाटमाट विचारायलाच नको, त्याचा तो रुबाब आणि बरेच काही. मग शाळेत होते तसे सर्वांचे स्वागत झाले असेल. मान्यवरांची भाषणे झाली असतील! किती गोड कल्पना आहे ही. अनन्या मात्र स्वप्नात पूर्ण रंगून गेली होती. गुलाबाच्या अध्यक्षीय भाषणातून लेखक सुंदर संदेश देतात. आजपर्यंत सगळ्यांच्या स्वागताला गुलाबच पुढे असायचा. कधीच कोणाचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. आज मात्र त्याच्या सर्व सुगंधी मित्रांनी त्याचा यथोचित मानसन्मान केला. आज गुलाबाला न्याय मिळाला. तो किती आनंदी झाला असेल! आपण टाळ्या वाजवतो, तशा फुलांनी पाकळ्या हलवल्या आणि त्यांचे संमेलन संपले. आज अनन्याचा वाढदिवस होता. तिचे गोड स्वप्न संपायच्या आतच तिच्या मैत्रिणी विविध फुले घेऊन तिला शुभेच्छा देण्यासाठी आल्या होत्या. अनन्या मात्र एका वेगळ्याच संमेलनात जाऊन आली होती. तिथे सुगंधाची उधळण होती. तिचे गोड स्वप्न तिच्या डोळ्यांच्या पापण्यात अलगद विसावले. तिच्या गालावर हळूच हसू फुलले. अशा आशयाचा हा पाठ.

आम्ही आमच्या संमेलनाकडे वळलो. सर्वांना बसण्यासाठी छान सतरंजीच्या पट्ट्या अंथरल्या होत्या. चटया टाकल्या होत्या. दोन मुलांमध्ये योग्य अंतर ठेवले होते. फुले ठेवायला बदामाची, पळसाची आणि केळीची मोठी मोठी पाने आम्ही आणली होती. मुलांना ती देण्यात आली. मुलांनी बागेतील फुले तर आणलीच होती, शिवाय रानफुलेदेखील आणली होती. पिवळा धमक झेंडू व लाल झेंडू, फटाकडी, लाल, पिवळा, पांढरा, चॉकलेटी, काश्मिरी असे अनेक प्रकारचे गुलाब, कर्दळ, पांढरी-निळी-गुलाबी जास्वंद, मोगरा, हजारी मोगरा, सामान्य सूर्यफूल, सूर्यफूल (कारळा) यलो येल्डर (पिवळा वडी), कोरफड, शेवगा, घेवडा, पपई, मोसंबी, कागदी पांढरी-लाल फुले, सोनमोहा, कुंदा, धोतरा, रुचिक, आष्टा, गलांडा, टाकळीवेलची फुले, जरबेरा, भोपळ्याची फुले, सदाफुली (पांढरी-जांभळी), गोकर्ण, गणेशवेलीची फुले, मोहरी, बेबीज ब्रेथ, गोल्डन, तुळस आणि स्वस्तिक अशी विविध फुले आज सर्वांना पाहायला मिळाली. मुलांनी फुलांची नावे सांगितली. मिळविलेली माहिती सांगितली. काही फुले त्यांनी आणली, पण त्याची त्यांना काहीच माहिती नव्हती. काही काही फुलांची तर आम्हांला नावेही माहीत नव्हती. आम्ही आजी-आजोबांकडून त्यांची नावे मिळवली. काही फुलांची माहिती इंटरनेटवरून मिळवली.

दुपारच्या सत्रात शीरखुर्मा, गुलगुले आणि गरमागरम भज्यांवर सर्वांनी मनसोक्त ताव मारला. सर्वांना ही मेजवानी खूपच आवडली. सर्वांना सुंदर फुले पाहायला मिळाली आणि गोड गोड पदार्थही खायला मिळाले. मजा आली.

म्हणतात ना, मुले म्हणजे देवाघरची फुले!

आपले आयुष्य हे फुलांसारखे सुंदर, उत्साही, आनंदी आणि प्रसन्न, तर लहान मुलांसारखे निरागस साधे, सरळ, खेळकर, धडपडणारे आणि कायम इतरांना सुख देणारे असावे, असा संदेश देणारा पाठ सर्वांना खूप आवडला.

◈◈◈

# स्नेहसंमेलने : व्यक्तिमत्त्व विकासाचे व्यासपीठ

पोपट धामणे

> *विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणाबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलने अत्यंत महत्त्वाची असतात. स्नेहसंमेलनातून कलांच्या सादरीकरणाबरोबरच आदर्श संस्कारमूल्ये रुजवणे आवश्यक आहे. यामध्ये भारतीय संस्कृतीचे विविध पैलू, भौगोलिक स्थळे, नाट्यशास्त्रामधील विविध रस, पर्यावरण इत्यादी विषयांची माहिती विद्यार्थ्यांना होत असते.*

दरवर्षी डिसेंबर–जानेवारी महिन्यात शाळाशाळांत स्नेहसंमेलनाची लगबग सुरू होते. नोटीस बोर्डावर स्नेहसंमेलनाची सूचना बघितली, की विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारतो. कोणाला अभिनय करायचा असतो, तर कोणाला गाणे म्हणायचे असते. कोणी विविध वेषभूषा साकारतो, तर कोणी विनोदाचा बादशाह होण्याचे स्वप्न बाळगतो.

एकूणच स्नेहसंमेलन म्हटले की, शाळेचा कोपरान्‌कोपरा प्रफुल्लित होतो. मुलांमध्ये एकच चर्चा असते ती म्हणजे, काय साकारले म्हणजे आपले वेगळेपण सिद्ध होईल. विद्यार्थी आपापल्या शिक्षकांना भेटून मनातील कल्पना सुचवितात. स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी धडपडणारे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग, स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी आणि त्यांना मदत करणारे इतर विद्यार्थी यांच्यामध्ये अनामिक चैतन्य भरलेले दिसते. दोन दशकांपूर्वी स्नेहसंमेलनाची संकल्पना वेगळी होती. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना मूर्त रूप देण्यासाठी शिक्षक खूप प्रयत्नशील असत. स्नेहसंमेलनात एखादे नाटक सादर करायचे झाल्यास नाटकाची संहिता निवडण्यापासून त्यातील पात्रे निवडण्यापर्यंत खूप खलबते व्हायची. संहिता निवडताना त्यातील विषयाचे भान राखले जायचे; कारण विषयाधारित पात्रे जेव्हा रंगमंचावर वावरतात, तेव्हा त्या भूमिकेचा नकळत त्या कलाकारांवर व प्रेक्षकांवर काही अंशी प्रभाव पडतो. फावल्या वेळात, मोठ्या सुट्टीच्या काळात, प्रसंगी सुट्टीच्या दिवशीदेखील तालीम सुरू राहायची. सहभागी कलाकार प्रत्येक भूमिका जगायला लागायचे. जसे नाटकाचे तसेच गायन–वादनाचे असे. एकेक चीज अथवा गाणे प्रत्येक हरकतीसह जोपर्यंत उत्तम सादर होत नाही, तोपर्यंत मुलांना रियाज करावा लागे. यातून त्यांच्या मनावर सर्वोत्तम संस्कारमूल्ये रुजायची आणि मुले सर्वार्थाने घडायची.




अलीकडील काळात स्नेहसंमेलनाची संकल्पना बदलत चालली आहे. तंत्रज्ञानाच्या आधारे कमी श्रमात कला सादर होताना दिसते. पूर्वी मोठ्या शहरांतील अतिश्रीमंत शाळांमधून कलादिग्दर्शकांच्या मदतीने कार्यक्रम सादर केले जात असत. रंगभूषा, प्रकाशयोजना, वेषभूषा या गोष्टींची रेलचेल असे. आता खेडोपाडीदेखील या गोष्टी

सहज उपलब्ध होत आहेत. विविध प्रकारची गाणी सीडीज अथवा पेनड्राईव्ह मध्ये घेता येतात. कोरिओग्राफरच्या मदतीने उडत्या चालींची गाणी सादर करून सवंग लोकप्रियता मिळवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. त्याने संस्कारमूल्ये किती रुजतात हा संशोधनाचा भाग होऊ शकतो.

शालेय रंगमंच कृत्रिम भासू लागले आहेत. आशयहीन कार्यक्रमांचे प्रमाण वाढले आहे. काही शाळांतील रंगमंचांनी तर भारतीय संस्कृती डावलून संपूर्ण पाश्चिमात्य संस्कृतीला आपलेसे केले आहे. यामध्ये दोष रंगमंचाचा नसून रंगमंचीय दिग्दर्शकाचा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. मात्र काही शाळा याला अपवाद आहेत. स्नेहसंमेलन दर्जेदार व विद्यार्थी विकसनाचे व्यासपीठ झाले पाहिजे, यासाठी उपयुक्त ठरतील असे काही विषय दिले पाहिजेत; याचा त्या शाळा गांभीर्याने विचार करतात. सर्वांनीच असे करणे गरजेचे आहे. सर्वच शाळांनी पुढील बाबी विचारात घेतल्या तर स्नेहसंमेलनाचा उद्देश साध्य होईल :

(१) **भारतीय मूल्यसंस्कार जपणारे कार्यक्रम :** विविध लोककथांच्या माध्यमांतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारे कार्यक्रम घेता येतील.

(२) वसुधैव कुटुंबकम् संकल्पना, शांतता, सांस्कृतिक वैविध्य, राष्ट्रीय एकात्मता, तसेच मानवकल्याणाचे महत्त्व सांगणारे विषय निवडावेत.

(३) **भौगोलिक स्थळांचे महत्त्व सांगणारे विषय :** उदा. : गंगेचे महत्त्व व स्वच्छता कशी राखता येईल ते प्रतिपादन करणे.

(४) **नवरसांवर आधारित कार्यक्रम :** भारतीय नाट्य शास्त्रामध्ये विविध रसांचे वर्णन आले आहे. उदा., शृंगार रस – लावणी, हास्यरस – विनोद वात्रटिका, वीररस – पोवाडा, वात्सल्य रस – अंगाई, अभंग, गवळण, अद्‌भूत रस – भारूड अशा विविधांगी विषयांची निवड करून रंगमंच अधिक समृद्ध करता येईल.

(५) **बालजगतातील विषय :** लहान मुलांमधील निरागसता, मैत्रभाव, खोडकरपणा आणि कल्पनेच्या जगात रमण्याची वृत्ती यांवर आधारित कार्यक्रम घेता येतील. उदा., परीकथेवर आधारित नृत्य, नाटुकले, बडबडगीते, बाहुलीचे लग्न.

(६) **पर्यावरण रक्षणावर आधारित विषय :** पर्यावरण रक्षणाचा विषय निवडल्यास मनोरंजनातून शिक्षण असा दुहेरी फायदा होईल. उदा. : झाडे, पाणी, वीज वाचवा, इंधन बचत.

(७) तापमानवाढीचे दुष्परिणाम, प्रदूषणाचे दुष्परिणाम हे विषय निवडून उत्तम सादरीकरणातून परिसर अभ्यास अधिक सोपा करून सांगता येईल.

(८) भारतीय संस्कृतीतील आईचे महत्त्व विशद करणे उदा., साने गुरुजींनी सांगितलेल्या गोष्टींचे नाट्यरूपांतर.

(९) विविध थोर व्यक्तिमत्त्वांचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर खोलवर परिणाम होत असतो. त्यासाठी विविध व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषा करून त्यांची संदेशपर किंवा गाजलेली वाक्ये सादर करणे. उदा. : महात्मा गांधी – 'चले जाव', गौतम बुद्ध– 'बुद्धम् शरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि, संघम् शरणं गच्छामि', स्वामी विवेकानंद –'वृथा वाचाळतेत आपल्या शक्तीचा अपव्यय करू नका. एकांतात ध्यान करा', डॉ. बाबासाहेब आंबेडकर – 'गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्याशिवाय तो पेटून उठणार नाही', लोकमान्य टिळक – 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच.'

(१०) **विविध लोकधारा :** भोजपुरी, राजस्थानी, बंगाली, छत्तीसगडी, कोकणी इत्यादी लोकधारांची लोकनृत्ये सादर करणे.

**(पृष्ठ क्र. २० वर)**

# भारतातील स्त्री-शिक्षणाची वाटचाल

**धम्मरत्न वायवळ**
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, बुलढाणा.
भ्रमणध्वनी : ९६०४१०८२८३

*कोणत्याही समाजाची, देशाची प्रगती ही त्या समाजातील, देशातील स्त्रियांचे शिक्षण कसे आहे व किती प्रमाणात आहे यावरून ठरवता येते.*

*भारतामध्ये महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये स्त्री शिक्षणाचा पाया रोवला. आज शिक्षणाच्या जोरावर अनेक स्त्रिया विविध क्षेत्रांत उच्चपदांवर कार्यरत आहेत. भारताचे पंतप्रधानपद श्रीम. इंदिरा गांधी यांनी भूषविले, तर सध्या भारताच्या राष्ट्रपतीपदी श्रीम. द्रौपदी मुर्मू आहेत, ही बाब आपणां सर्वांसाठी अभिमानास्पद आहे.*

*या लेखात भारतातील स्त्री शिक्षणाच्या वाटचालीची अभ्यासपूर्ण मांडणी लेखकांनी केली आहे.*

वैदिक काळात भारतात स्त्रियांना सर्व प्रकारचे शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक अधिकार प्राप्त होते मैत्रेयी, गार्गी यांसारख्या विदुषींच्या उदाहरणावरून हे समजून येते, परंतु त्यानंतर बालविवाह, पडदा पद्धती, सती जाणे यांसारख्या अनिष्ट प्रथांमुळे स्त्रियांचे सामाजिक स्थान दुय्यम ठरवले गेले व औपचारिक शिक्षणातील प्रवेश हा अतिशय दुर्मीळ झाला. स्त्रियांना कोणतेच सामाजिक आणि शैक्षणिक अधिकार राहिले नाहीत.

स्त्रीचे समाजात नेमके कोणते स्थान आहे? एक व्यक्ती म्हणून, एक घटक म्हणून तिचा समाजात दर्जा काय आहे? या प्रश्नांचा विचार केला, तर आपल्याला असे आढळून येईल, की सामाजिक व आर्थिक स्थित्यंतराशी आणि प्रस्थापित मूल्यव्यवस्थेच्या परिवर्तनाशी तो निगडित आहे.

भारतात इंग्रजी राजवट सुरू झाली. या राजवटीत इंग्रजी विद्येचे म्हणजेच वाघिणीचे दूध पिऊन विचारवंतांची पिढी तयार झाली. या विचारवंतांच्या पिढीने शिक्षणाचे महत्त्व जाणले आणि समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षित करण्याचा प्रयत्न सुरू केला. स्त्रियांच्या सामाजिक दर्जाविषयी समाजात असलेली हीनपणाची भावना दूर करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी आणि परिणामकारक माध्यम होऊ शकते याचा विचार तत्कालीन समाजसुधारक आणि विचारवंत यांनी केला. यामध्ये राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महाराष्ट्रातील महात्मा जोतीराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारखे समाजसुधारक अग्रस्थानी होते.



स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावण्याचा प्रयत्न एकोणिसाव्या शतकात फार मोठ्या प्रमाणावर झाला. त्या शतकात संपूर्ण जगात आणि भारतातही शिक्षणाचे वारे वाहू लागले. शिक्षण हेच समाजव्यवस्थेत सकारात्मक आणि शाश्वत बदल घडवून आणण्याचे एकमेव साधन आहे, असा मतप्रवाह निर्माण झाला. यामुळे समाजातील स्त्री-शिक्षणाच्या वाटचालीस प्रारंभ झाला. भारतातील स्त्री-शिक्षणाच्या वाटचालीचा अभ्यास करताना आपणास दोन भागांत त्याचे स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे. एक स्वातंत्र्यपूर्व भारतातील स्त्री-शिक्षणाची वाटचाल आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री-शिक्षणाची वाटचाल.

## स्वातंत्र्यपूर्व भारतातील स्त्री-शिक्षण :

भारतात प्राचीन काळी, मध्ययुगीन काळी आणि १८व्या शतकात स्त्रीचे स्थान हे अत्यंत दुय्यम होते, स्त्रियांना समान दर्जा मिळावा यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज, तसेच भारतीय विचारवंतांनी अतोनात प्रयत्न केले. भारतीय विचारवंत राजा राममोहन रॉय यांनी स्त्री-शिक्षणाविषयी असे म्हटले आहे की, Women should not be in Parda or confide to their homes but should get equal education as men so that they could stand against the atrocities against them and also fight various social evils. राजा राममोहन रॉय यांच्या मते, ''जर स्त्रीला शिक्षित केले, तर ती तिच्या विरोधात असणाऱ्या आणि घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या विरोधात कंबर कसून उभी राहील.'' १८५४ मध्ये ब्रिटिश सरकारने जाहीर केलेल्या 'वुडच्या खलित्यात' स्त्री-शिक्षणाविषयी अधिक व्यापक विचार मांडला होता. त्यात असे नमूद केले होते की, भारतीय लोकांमध्ये मुलींना शिकविण्याची प्रचंड इच्छा आहे. पुरुषांना दिलेल्या शिक्षणापेक्षा स्त्री-शिक्षण लोकांवर अधिक प्रभावीपणे नैतिक आणि शैक्षणिक परिणाम करते. त्यामुळे समाजातील प्रत्येक स्त्री शिक्षित झाली पाहिजे, यासाठी त्यांनी ब्रिटिश सरकारला वार्षिक एक लाख रुपये शिक्षणावर खर्च करावे, असे सुचविले होते. भारतीय स्त्री शिक्षणाच्या विकासात ब्रिटिश राजवटीतील लॉर्ड बेंटिक १८५९ 'मधील स्टँडलेचा खलिता', १८८२ च्या 'भारतीय शिक्षण आयोगाच्या प्रमुख शिफारशी; ज्यामध्ये मुले आणि मुली यांच्या शिक्षणासाठी समान निधी, स्त्री शिक्षणासाठी स्थानिक संस्थांनी पुढाकार घेणे, मुलांच्या शाळेपेक्षा मुलींच्या शाळांना अधिक अनुदान, त्याचबरोबर १९०४ व १९१३ मधील 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया रिझर्व्हेशन' मधील स्त्री-शिक्षणासाठी अधिक पैसा खर्च करावा या शिफारशी, तसेच १९२९ मधील 'हरटाग समिती'ने मुलांच्या आणि मुलींच्या शिक्षणातील संख्येमधील असणारी तफावत दूर करावी अशी केलेली शिफारस आणि मुलींसाठी स्त्री शिक्षक, स्त्री निरीक्षक नेमावी अशी केलेली शिफारस या बाबी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्री-शिक्षणाच्या वाटचालीस साहाय्यभूत ठरल्या. १९४४ मधील 'सार्जंट प्लॅन' यात असे म्हटले होते, की जे कायदे मुलांच्या शिक्षणाला लागू होतात, तेच मुलींच्या शिक्षणालासुद्धा लागू होतात.



## महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले :

भारतीय स्त्री-शिक्षणाच्या इतिहासाची सुरुवात ज्या महामानवांच्या कार्याने होते अशा थोर भारतीय शिक्षणतज्ज्ञांमध्ये महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्थान नेहमीच अग्रस्थानी असणार आहे. इसवी सन १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत, भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरु करून स्त्री-शिक्षणाचा पाया घालण्याचे महान कार्य या दांपत्याने केले आहे. भारतीय स्त्री-शिक्षणाची वाटचाल आणि विकास यांचा आरंभबिंदू हा खऱ्या अर्थाने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या काळात पाहावयास मिळतो. सामाजिक प्रतिकूलता, आर्थिक चणचण अशा अनंत अडचणी व अनेक संकटांवर मात करून अवघ्या चार वर्षांच्या कालावधीत शाळा काढून त्या नेटाने चालविण्याचे हे देशातील एकमेव उदाहरण होय. स्त्री-शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक अत्यंत प्रभावी असे साधन आहे, सांगणारे स्त्री-शिक्षणाचे अग्रदूत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व स्त्रीमुक्तीचे कार्य समाजाला सामाजिक पारतंत्र्यातून

मुक्त करून मानवतेचे मूल्य रुजवणारे आहे. शिक्षणातून स्त्रिया बळकट होतील आणि त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार यांपासून त्यांचे संरक्षण होईल, तसेच शिक्षणाच्या माध्यमातून त्या आपल्या परिवाराला व समाजाला घडवतील असा विश्वास त्यांना होता. स्त्री-शिक्षणाविषयी त्यांचे कार्य हे समाजाला नवसंजीवनी देणारे आहे. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळेच आज स्त्रियांना सर्व क्षेत्रांत समान संधी मिळत आहे. त्यांच्या या कार्यातून प्रेरणा घेऊनच स्वातंत्र्यानंतर अधिक व्यापकपणे स्त्री-शिक्षणाविषयी विचार होऊ लागला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-शिक्षणाची वाटचाल :**

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीद्वारे भारतातील सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना समान अधिकार देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. इतर कोणत्याही व्यक्तीप्रमाणे स्त्रीदेखील एक स्वतंत्र व्यक्ती आहे, त्यामुळे तिला आपली मते व्यक्त करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने बहाल केला आहे. इतर सर्व पुरुषांप्रमाणे सर्वाधिकार मिळवण्यासाठी स्त्री शिक्षण अत्यंत आवश्यक बाब आहे. स्त्री शिक्षणाशिवाय स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य मिळू शकणार नाही. आपण स्वतंत्र व्यक्ती आहोत, आपल्याला सर्व अधिकार घटनेने दिले आहेत याची जाणीव शिक्षणच निर्माण करून देऊ शकते. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व स्त्री-पुरुषांना समान पातळीवर आणण्यासाठी आवश्यक त्या कलमांची निर्मिती करून भारतीय संविधानाद्वारे स्त्रियांना शिक्षणाचा व सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-शिक्षणाच्या विकासासाठी, प्रचार-प्रसारासाठी करण्यात आलेले सर्व प्रयत्न व त्या प्रयत्नांना आलेले यश याचे मूळ भारतीय संविधानात सापडते. स्त्रियांच्या शिक्षणाविषयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार अत्यंत प्रेरणादायी आणि परिणामकारक आहेत. स्त्री शिक्षणाविषयी ते ग्रामगीतेमधील २० व्या अध्यायातील ओवी क्रमांक ८४ मध्ये असे म्हणतात की,

*महिलांचा आंतरिक गुणांचा विकास।*
*करील ऐसे शिक्षण खास।।*
*जरि दिलें जाईल त्यांस।*
*तरिच भावी जग पालटे।।*

'जगाच्या उज्ज्वल भविष्यासाठी स्त्री-शिक्षण ही काळाची गरज आहे,' असे संत तुकडोजी महाराज म्हणतात. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच खऱ्या अर्थाने स्त्री-शिक्षणाचा विकास अधिक वेगाने झाला. भारत सरकारने स्थापन केलेले विविध शैक्षणिक आयोग आणि विविध शैक्षणिक धोरणे यांच्या मध्यवर्ती संकल्पनेत स्त्रीशिक्षण हा विषय होता. त्यात प्रामुख्याने १९४८ चा विद्यापीठ आयोग, १९५२ मधील 'मुदलियार आयोग', १९५७ मधील 'दुर्गाबाई देशमुख समिती', १९६१ मधील 'National Council for Women Education', १९६३ मधील 'ग्रामीण भागातील स्त्री-शिक्षणासाठीची समिती', १९६४-६६ चा 'कोठारी आयोग', १९६८ चे 'पहिले शिक्षण धोरण', १९८६ चे 'दुसरे शिक्षण धोरण', १९८६ चा 'कृती कार्यक्रम', १९९० मधील 'राममूर्ती समिती', १९९२ मधील 'कृती कार्यक्रम', २००५ मधील 'नॉलेज कमिशन', २००९ मधील 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९' यांचा समावेश आहे. अशा अनेक प्रयत्नांद्वारे भारताने भारतीय स्त्री-शिक्षणाविषयी सुधारणात्मक आणि गुणात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-शिक्षणाच्या वाटचालीमध्ये महत्त्वपूर्ण ठरलेला कोठारी आयोग, दुर्गाबाई देशमुख समिती आणि १९८६ चे शैक्षणिक धोरण हे सर्वाधिक महत्त्वाचे टप्पे आहेत.

## स्त्री–शिक्षणासाठी राष्ट्रीय समिती १९५७ :

स्त्री–शिक्षणासाठी नेमण्यात आलेल्या राष्ट्रीय समितीलाच 'दुर्गाबाई देशमुख समिती' या नावाने ओळखले जाते. या समितीने स्त्री–शिक्षणासंदर्भात तीन प्रकारच्या शिफारशी सरकारला केल्या होत्या. त्यामध्ये –

(१) राष्ट्रीय स्तरावर स्त्रिया व मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय समिती स्थापन करावी.

(२) पुढील अनेक वर्षे स्त्री–शिक्षण ही एक महत्त्वाची समस्या समजून ती सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करावा.

(३) स्त्री–शिक्षणासाठीच्या योजनांना खास प्राधान्य द्यावे, शिवाय शिक्षणावर ठरविण्यात येणाऱ्या खर्चात स्त्री–शिक्षणाचा वाटा अधिक असावा.

(४) देशातील स्त्री–शिक्षणाचा सखोल अभ्यास करून स्त्री–शिक्षणाविषयी निश्चित धोरण ठरविण्यासाठी राज्यांनी विकासात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी अशी शिफारस दुर्गाबाई देशमुख समितीने केली. प्रशासकीय पातळीवर प्रभावी समन्वयासाठी प्रत्येक टप्प्यावर स्त्री–अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी आणि स्त्री–शिक्षणासाठी केंद्र सरकारने बहुव्यापी कार्यक्रम तयार करून, त्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात प्रभावीपणे करावी, अशा प्रकारच्या शिफारशी या समितीने केंद्र सरकारला केल्या. त्यामुळे NCERT व मानव संसाधन विकास मंत्रालय यांमध्ये स्वतंत्र अशा स्त्री–शिक्षण विभागाची स्थापना करण्यात आली.

## कोठारी आयोग १९६४–६६ :

भारतीय शिक्षणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कोठारी आयोगाने १९५७ मधील दुर्गाबाई देशमुख समितीच्या स्त्री–शिक्षणाविषयीच्या सर्व शिफारशींना पाठिंबा दिला. राष्ट्रीय शिक्षण समितीने सुचविलेल्या स्त्री–शिक्षणाविषयीच्या खास कार्यक्रमांवर भर दिला पाहिजे असे या आयोगाने सुचविले. मुली आणि स्त्रिया यांच्या शिक्षणाकडे सातत्याने लक्ष देण्यासाठी केंद्र आणि राज्य पातळीवर खास यंत्रणा उभारणे आवश्यक आहे असे सुचविले. माध्यमिक शाळांत उच्चशिक्षित असलेल्या अधिकाधिक स्त्रियांना अर्धवेळ नोकरीची संधी उपलब्ध करून द्यावी, शिवाय शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक संस्था या ठिकाणी स्त्रियांना पूर्णवेळ नोकरीची संधी निर्माण करावी अशी शिफारस या आयोगाने शासनाकडे केली. मुले व मुली यांच्या अभ्यासक्रमातील भेदासंबंधीची समिती १९६१, या समितीच्या अध्यक्ष श्रीमती हंसा मेहता यांनी केलेली मुलामुलींच्या अभ्यासक्रमात फरक असू नये अशी शिफारस कोठारी आयोगानेसुद्‌धा केंद्र सरकारला केली. कोठारी आयोग हा भारतीय शिक्षणावर दूरगामी परिणाम करणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे या आयोगाने स्त्रीशिक्षणाविषयी केलेल्या बहुतांश शिफारशी स्वीकारून सरकारने स्त्री–शिक्षणाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला.

## १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :

The education of girls should receive emphasis not Grounds of Social Justice but also it accelerates social transformation. अशा शब्दांत या धोरणाने स्त्री–शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे.

१९८६ च्या धोरणामुळे खऱ्या अर्थाने भारतातील स्त्री–शिक्षणाला गती प्राप्त झाली. या धोरणात सर्वार्थाने स्त्री–शिक्षणाचा सखोल विचार झाला. या धोरणाचा स्त्री–शिक्षणावर दूरगामी परिणाम झाला आहे. आज स्त्री–शिक्षणाची असलेली सकारात्मक आणि आनंदाची स्थिती ही १९८६ च्या धोरणाची फलश्रुती आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

या धोरणाने स्त्री–शिक्षणाविषयी अत्यंत व्यापकपणे विचार करून, धोरणात्मक अंमलबजावणी करण्यासाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमांची आणि उपक्रमांची निर्मिती करावी अशा प्रकारची शिफारस केंद्र सरकारला केली. त्यामध्ये पुढील मुद्दे मांडण्यात आले :

(१) स्त्रियांना समानता मिळवून देण्यासाठी शिक्षण द्यावे.

(२) स्त्रियांसाठी विशेष पूरक नोकऱ्यांची तरतूद करावी. उदाहरणार्थ : तंत्रज्ञानात स्त्रियांचा सहभाग वाढवणे.

(३) स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाला अधिक चालना देणे.

(४) स्त्रियांची निरक्षरता आणि प्राथमिक शिक्षणात येणाऱ्या अडचणी दूर करणे.

(५) १९९५ पर्यंत मुलींना, स्त्रियांना उच्च प्राथमिक शिक्षण देणे.

(६) स्त्रियांच्या अधिकारांविषयी चर्चा करून, १९९५ पर्यंत स्त्रियांची स्वतंत्र संघटना निर्माण करणे. त्यांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवणे.

(७) शालेय स्तरापर्यंत शिक्षक भरतीमध्ये स्त्रियांना प्राधान्य देणे.

(८) राष्ट्रीय नियोजन व प्रशासन संस्था आणि विविध राज्यस्तरीय संस्था, यांनी स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जाणीव निर्माण करणाऱ्या कार्यक्रमांची आखणी करणे.

(९) स्त्रियांच्या शिक्षणाचा विकास आणि विचार सातत्याने व्हावा, यासाठी निरंतर शिक्षणकेंद्रांची निर्मिती करणे व त्याद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

अशा विविध शिफारशी आणि सूचना १९८६ च्या धोरणाने स्त्री–शिक्षणाविषयी शासनाला केल्या. आज स्त्री–शिक्षणाचा किंबहुना भारतातील एकंदरीत शिक्षणाचा जो प्रवाह वेगाने प्रवाहित झाला आहे, त्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे १९८६ चे शैक्षणिक धोरण होय. आज स्त्रियांचा शिक्षणामध्ये वाढलेला सहभाग, त्यांचे साक्षरतेचे प्रमाण पाहता, शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण वाढवण्यासाठी १९८६ चे धोरण अत्यंत परिणामकारक ठरले आहे. त्यामुळे १९८६ चे धोरण, हे भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील एक सुवर्णपान आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. १९८६ च्या धोरणावर आधारित १९९० मधील राममूर्ती समितीने मुलींसाठी शिक्षणाची सोय व शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षणाचा आशय आणि स्त्री–पुरुष समानता, स्त्रियांना विशेष प्रशिक्षणे, स्त्रियांचे सबलीकरण, शैक्षणिक श्रेणीमध्ये स्त्रियांना प्रतिनिधित्व व स्त्रीविषयक अभ्यास संशोधन आणि विकास या विषयांवर अनेक शिफारशी सरकारला सुचविल्या. त्यावर प्रभावीपणे काम करून स्त्री–शिक्षणाची वाटचाल ही अधिक वेगाने कशी होईल याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी करण्यात आला आहे.

'शिकलेली आई घर पुढे नेई' या उक्तीप्रमाणे स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा आणि समाजाचा चेहरा–मोहरा बदलला आहे. बालमृत्युदराचा विचार केला, तर ज्या मातांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे, त्यांच्याबाबतीत निरक्षर मातांच्या तुलनेत तो कमी आहे; म्हणजेच स्त्रियांचे शिक्षण हे आरोग्यासाठी साहाय्यभूत ठरते. देशातील ५०% मुली माध्यमिक शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत, तरी पण संशोधनात असे दिसून आले आहे, की मुलींच्या शाळेतील प्रत्येक अतिरिक्त वर्ष, त्यांच्या आजीवन उत्पन्नात १५ टक्के वाढ करते. स्त्री–शिक्षणाच्या समाजावर होणाऱ्या व्यापक परिणामामुळे, महिलांच्या शिक्षणातील असमानता दूर करण्यासाठी स्त्री–शिक्षण हे शाश्वत विकास

**(पृष्ठ क्र. २५ वर)**

# मुलांनीच लिहिते ठेवले मला...

**एकनाथ आव्हाड**
शृंगारपुरे हाऊस, फ्लॅट नं. १, ए विंग,
चेंबूर, मुंबई.
भ्रमणध्वनी : ९८२१७७७९६८

*गोष्टीचे आकर्षण सगळ्यांनाच असते. आपणसुद्धा आपल्या लहानपणी आजी-आजोबांकडून गोष्टी ऐकतच वाढलो. आताही आपण टीव्ही मालिका, सिनेमा, नाटक इत्यादी आवडीने पाहतो, कारण त्यात गोष्ट असते. हाच धागा पकडून लेखकाने शिक्षक असताना नोकरीच्या पहिल्या दिवशी मुलांशी मैत्री करण्यासाठी, त्यांच्या हृदयाजवळ पोहोचण्यासाठी एका कथेचाच आधार घेतला. गोष्ट सांगत असताना मुलेही त्यात सहभागी झाली आणि बघता बघता त्यांच्याशी बोलू लागली, मनातल्या गोष्टी सांगू लागली. इथून शिक्षक म्हणून सुरू झालेला लेखकाचा रंजक प्रवास या लेखात वाचायला मिळेल.*

मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत ३० वर्षे शिक्षक म्हणून मी कार्यरत आहे. आजही चांगला आठवतो आहे मला... मी शिक्षक म्हणून शाळेत रुजू झाल्याचा माझा शाळेचा पहिला दिवस. मी वर्गात शिरताच माझ्यावर रोखले गेले सहा डझन उत्सुक, बोलके डोळे... त्या चिमुकल्या डोळ्यांत केवढे भाबडे प्रश्न होते. हे नवीन सर कसे असतील, काय शिकवतील, आणखीन बरेच काही. त्या दिवशी मुलांशी मी खूप बोललो. माझा त्यांच्याबरोबरचा पहिलाच दिवस होता, म्हणून सुरुवात नेमकी कुठून करावी ते मलाही कळेना. कळले एवढेच, की या मुलांशी बोलावे आणि बोलता बोलता त्यांनाही बोलते करावे. मी त्यांना 'कावळ्याने खाल्ल्या शेवया' ही तालकथा सांगितली. तालकथेची एक गंमतच असते. कथा-काव्याचा सुंदर मिलाफ तर त्यात असतोच, शिवाय गोष्ट पुढे सरकवताना मुलांचा त्या गोष्टीत सुंदर सहभागही घेता येतो. गोष्ट ऐकल्यावर मात्र वर्गात जणू चमत्कार घडला. मुलांची कळी खुलली. मुले वर्गातील, शाळेतील कितीतरी गोष्टी सांगू लागली. मी आस्थेने ऐकतो आहे म्हटल्यावर काही जण तर आपल्या घरातील बऱ्याच गोष्टीही हातचे काहीही राखून न ठेवता निरागसपणे मला सांगू लागले. पहिल्या दिवशी शिकविण्यापेक्षा गप्पाच अधिक झाल्या.







मस्त ओळखपरेड झाली. मुलांच्या गालावरच्या कळ्या खुलल्या.

शाळा सुटायला शेवटची दहा मिनिटे बाकी होती. तेवढ्यात एक जण म्हणाला, ''सर आणखी एक गोष्ट सांगा ना! तुम्ही मघाशी सांगितलेली गोष्ट खूप भारी होती. जाम आवडली मला.'' मग काय इतर मुलांनीही त्याचीच री ओढली. ''सर गोष्ट... गोष्ट'' मुलांनी एकच कल्ला केला. मग मी म्हटले, ''मघाशी कावळ्याची गोष्ट सांगितली, आता चिमणीची सांगतो... चालेल?'' मुले उत्साहाने म्हणाली,

''पळेल... सांगा, सांगा... चिमणीची सांगा. मस्त सांगता तुम्ही गोष्ट.'' मुलांची भारीच चिवचिव वाढली. ''बरं सांगतो... सांगतो. शांत बसा आधी.'' वर्ग एकदम चिडीचूप. गोष्ट ऐकण्यासाठी खूप आतूर. मी गोष्ट सांगितली. सर्व वर्ग जिवाचे कान करून गोष्ट ऐकत होता. त्यांचे उत्सुक बोलके डोळे एकटक माझे हावभाव टिपत होते. गोष्ट संपली. अनपेक्षितपणे टाळ्यांचा उत्स्फूर्त कडकडाट झाला. शाळा सुटल्याची घंटा झाली. मुले दप्तर पाठीवर अडकवत म्हणाली, ''सर, कवितासुद्धा म्हणा, आम्हांला कवितासुद्धा आवडतात.''

घरी जाताना आजच्या दिवसाची उजळणी माझ्या मनात सुरू होती. वर्गात शिरलो तेव्हाची शांत मुले आणि वर्ग सुटल्यावर मला आपलेपणाने उद्या नवीन गोष्ट सांगा, कविता म्हणा, असे माझ्याशी बोलणारी तीच बोलकी, हसरी मुले. केवढा हा फरक. माझ्या लक्षात आले, ही सारी जादू गोष्टीची आहे.

कथाकथन, कविता हा माझा अत्यंत आवडीचा प्रांत. जेव्हा मुले वारंवार नवीन गोष्टींची, कवितांची फर्माईश करतात, अशा वेळी 'आपणही मुलांसाठी कथा, कविता का लिहू नयेत?' या मी मलाच विचारलेल्या माझ्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आले. 'प्रयत्न तर करून पाहूया', या माझ्या विचाराला कृतीची जोड मिळाली, ती माझ्या वर्गातील विद्यार्थिनी सविता पटेकरमुळे. सतत गैरहजर असणारी सविता शाळेत यावी म्हणून मी अनेक प्रयत्न केले. तिचे घर शोधून काढले. सविताशी बोललो. तिच्या आईला समजावून सांगितले. तिच्या आईने घरची हलाखीची परिस्थिती कथन केली. मी तिच्या आईला म्हटले, ''तुमच्या वाट्याला जे आयुष्य आलेय, ते तुमच्या मुलीच्या वाट्याला आले तर बरे वाटेल का हो?'' कदाचित या प्रश्नाने ती माउली खडबडून जागी झाली असावी. दुसऱ्या दिवशी कामाला जाताना ती सविताला शाळेत घेऊन आली. आपली कर्मकहाणी सांगता सांगता ती तिच्या डोळ्यांतील अश्रूंना वाट करून देत होती. त्या वेळी मला जे काही वाटले, ते मी शब्दबद्ध केले आणि त्याची कविता झाली. माझ्या आयुष्यातली खऱ्या अर्थाने मी लिहिलेली ही पहिली कविता. कवितेचे शीर्षक होते, 'सविता पटेकर, सतत गैरहजर'. माझ्या या कवितेचे शाळेने खूप कौतुक केले.

मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या मुखपत्रात ती कविता छापून आली. महापालिकेत एक कवी म्हणून माझी नवी ओळख निर्माण झाली. मनात आले, वर्गात 'सविता' नसती, तर माझी 'कविता' नसती. यातून एक गोष्ट घडली... माझा लिखाणाचा हुरूप वाढला. तीच कविता आज आपल्यासाठी देत आहे.

**सविता पटेकर... सतत गैरहजर**

*शाळेत आली आई,*
*आपल्या मुलीला घेऊन*
*काकुळतीला येऊन म्हणाली,*
*'यापुढं नाही राहायची घरी,*
*मास्तर वर्गात घ्या हिला ठेवून'*
*मुलीचं नाव, सविता पटेकर, वर्गात सतत गैरहजर*
*आई म्हणाली, 'रोज ही घरी त्रास देते आणि*
*शाळेत जा म्हटलं तर, अंगावर पांघरूण घेते,*
*खायला-ल्यायला मात्र चांगलं मागते*
*अन् या त्या कारणावरून माझ्याशी रुसते.*
*हिच्यासाठी काय काय करू, कुणा कुणाचे पाय धरू.*
*चार घरची धुणीभांडी करते.*
*या पोरीसाठी मरमर मरते.*
*नवरा माझा गेला मरून!'*
*आईचं बोलणं पोटतिडकिनं, पण पोरगी मात्र ढिम्म,*
*नाव तिचं सविता पटेकर, वर्गात सतत गैरहजर!*

*मी म्हणालो तिला, 'का गं शाळेत येत नाही?*
*खरं सांगतो मी तुला मारणार नाही!'*
*पण मुलगी काहीच बोलेना; आईला आला राग.*
*आईने तिच्या गालफडात मारलं.*
*अन् मुलीनं आईकडं रागानं पाहिलं.*
*मला वाटलं, येथे चुकतं कोणाचं?*
*मुलीचं की, तिच्या आईचं,*
*मास्तरांचं की, इथल्या शिक्षण पद्धतीचं.*
*मी काहीसा निरुत्तर*
*सविता पटेकर, वर्गात सतत गैरहजर!*
*मनापासून ठरवलं, हिची समस्या शोधून काढावी.*
*अभ्यासाची पुस्तकं, आणून तिला द्यावी.*
*या लहानशा जिवाला, आता आपण समजून घेऊ*
*आपल्यातला अर्धा डबा, रोज तिला देऊ.*
*मनाशी सारं ठरवून एक एक विषय घेतला.*
*खेळ-गाणी गोष्टींचा तासही आज घेतला.*
*दुसऱ्या दिवशी वर्गात गेलो*
*हजेरी घेतली, नाव पुकारलं, 'सविता पटेकर'*
*मुलं म्हणाली, 'गैरहजर.'*
*माझं मन सुन्न झालं.*
*कालचा दिवस आठवला*
*बॅगेतल्या डब्याकडं लक्ष गेलं,*
*टेबलावर तिच्यासाठी पुस्तकं होती.*
*या पुस्तकात तिचं आता कसं शोधू उत्तर?*
*तेवढ्यात... तेवढ्यात दारातून कोवळे शब्द आले*
*'सर, वर्गात येऊ?'*
*दाराकडं पाहिलं तर, दारात सविता उभी.*
*शाळेच्या गणवेशात, दोन घट्ट वेण्या घालून.*
*माझं मन फुललं.*
*वर्गातली सारी मुलं एका सुरात म्हणाली, 'सर, सविता हजर, सर सविता हजर!'*

माझ्या या कवितेचे शाळेने खूप कौतुक केले.

सुरुवातीला खूप बालकविता लिहिल्या. मुलांपुढे प्रसंगानुरूप त्या सादर केल्या. एका वृत्तपत्रासाठी वर्षभर दर रविवारी मुलांसाठी 'बोधकविता' हे कवितेचे सदर चालवले. एक चिमुकली गोष्टच कवितेत गुंफून लिहू लागलो. जशी की दोन विळे ही कविता...

*गावच्या एका घरात दोन विळे होते*
*त्यांचे वागणे मात्र बरेच वेगळे होते*
*एक विळा कोपऱ्यात बसून गंजून गेला होता*
*दुसरा विळा काम करून लखलख करीत होता*
*गंजलेला विळा एकदा लखलखत्या विळ्याला म्हणाला,*
*''तू एवढं काम करतोस*
*पण जाणीव आहे का मालकाला*
*धार लावण्यासाठी तुला दगडावर तो घासतो*
*सदान्कदा कामामध्ये वापरत तुला असतो*
*पण मी बघ कसा अगदी आरामात बसून राही*
*तुझ्यासारखे कष्ट मुळीच मला नाही''*
*आता लखलखता विळा गंजलेल्या विळ्याला म्हणाला,*
*''अरे जीवन सार्थ करायचे तर उपयोगी पडावे जनाला*
*मी माझ्या कामाने लोकांच्या लक्षात राहीन*
*नुसते गंजून पडण्यापेक्षा चांगले करून जाईन!''*

कथाकाव्य हे सदर बालवाचकांच्या आवडीचे झाले. या गोष्टीरूप बालकविता मुलांपुढे सादर करताना मुलांचे हसरे चेहरे, नाचरे डोळे बरेच काही सांगून जायचे. त्या कवितांचे पुढे 'बोधाई' हे पुस्तक निघाले. डॉ. विजया वाड यांचे या कामी मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकांच्या एका प्रशिक्षण कार्यक्रमात 'बोधाई' पुस्तकातील बालकविता सादर करण्याचा कार्यक्रम

केला. शिक्षकांना तो कार्यक्रम खूप आवडला. हजारएक प्रती हातोहात संपल्या. केवढा हा आनंदाचा क्षण!

नंतर पहिलीच्या मुलांना गतिशील वाचनाचा आनंद मिळावा, तसेच मराठी भाषेची नुकतीच ओळख झालेल्या इंग्रजी माध्यमाच्या मुलांना सोप्या, सुटसुटीत बालकविता वाचायला मिळाव्यात म्हणून मी जोडाक्षर विरहित 'गंमत गाणी' लिहिली; जशी की...

*झाडा रे झाडा, डोल रे डोल*
*फळासारखे तुझे, गोड गोड बोल*
*झाडाला आली, सुगंधी फुले*
*फुलांनी बांधले, झाडावर झुले*
*पानांनी धरला, तालावर ताल*
*झाडाने घातला, पायात चाळ*
*झाडाची फुले, उतरली खाली*
*सुगंधी सारी, जमीन झाली*

अशा जोडाक्षर विरहित बालकवितांचे 'गंमत गाणी' हे पुस्तक तयार झाले आणि या पुस्तकाने खऱ्या अर्थाने बालसाहित्यिक म्हणून माझे अवघे आयुष्य उजळवून टाकले. अनेक वाचकांनी, समीक्षकांनी हे पुस्तक उचलून धरले. एक वेगळा प्रयोग म्हणून शाब्बाऽऽस म्हणाले! एवढे कमी की काय, महाराष्ट्र शासनाने उत्कृष्ट बालवाङ्मयाचा वा. गो. मायदेव राज्य पुरस्कार या पुस्तकाला देऊन यथोचित गौरव केला.

एव्हाना माझी बालकवितांची गाडी मुलांना सोबत घेऊन सुसाट निघाली होती. आता बालकवितांसोबत बालकथा, नाट्यछटा, मजेदार कोडीही मोठ्या हुरुपाने लिहू लागलो... लिहिलेले मुलांसमोर सादर करू लागलो. मुलांचा नव्या ताज्या कथेला, कवितेला मिळणारा ताजा प्रतिसाद मला खऱ्या अर्थाने लिहिते ठेवू लागला. मग मज्जाच मज्जा. अक्षरांची फुले, हसरे घर, तळ्यातला खेळ, पंख पाखरांचे, आभाळाचा फळा, खरंच सांगतो दोस्तांनो, सवंगडी, आनंद झुला, मजेदार गाणी, छंद देई आनंद अशी कितीतरी बालकवितांची पुस्तके आकाराला येत गेली. आनंद देत गेली.

एका प्रकाशकाने स्वतःहून फोन करून, 'आमच्यासाठी बालकथा लिहाल का,' असे विचारल्यावर मी या संधीचा फायदा घेतला. राजा झाला जंगलाचा, निष्फळ भांडण, थेंबे थेंबे तळे साचे, जरा ऐकून तर घ्या! ही चार बालगोष्टींची पुस्तके लिहिली. मुलांसाठी लिहिताना आणि लिहिलेले मुलांपुढे सादर करताना मनापासून आनंद मिळत गेला. विविध वृत्तपत्रांतून मुलांसाठी गोष्टींचे सदर चालवायला मिळाले. त्यातूनच 'आनंदाची बाग', 'एकदा काय झालं', 'खळाळता अवखळ झरा' हे बालकथासंग्रह आकाराला आले. हे गोष्टीरूप संग्रह मुलांच्या, शिक्षकांच्या, पालकांच्या आवडीचे झाले. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त क्वचितच दिसणाऱ्या नाट्यछटा आपण मुलांसाठी लिहाव्यात या विचाराने वेगवेगळ्या विषयांवर अनेक नाट्यछटा लिहिल्या. 'मला उंच उडू दे..!' हे नाट्यछटांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. मुले या नाट्यछटा व्यासपीठावर सादर करू लागली.

मुलांसाठी, शिक्षकांसाठी अनेक शाळांतून, विविध बालसाहित्य संमेलनांतून तसेच अनेक शैक्षणिक कृति–कार्यक्रमांतून माझे कथाकथन, कवितांचे कार्यक्रम सुरू झाले. हे माझे काम पाहूनच प्रकाशभाई मोहाडीकरांनी अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेतर्फे राज्यस्तरीय उत्कृष्ट कथानिवेदक साने गुरुजी हा पुरस्कार मला अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या वार्षिक अधिवेशनात वर्धा येथे २००८ साली दिला.

एकदा मोठी गंमतच झाली. चेंबूरच्या मुक्तानंद शाळेतील मुलांना दोन–तीन नवीन बालकविता मी वाचायला दिल्या. त्यातील एका मुलाने त्याला दिलेल्या बालकवितेवर मला समर्पक चित्र काढून दिले. ते चित्र पाहून मला एक अभिनव कल्पना सुचली. आपल्या

पुढील बालकवितासंग्रहाला मुलांकडूनच चित्रं काढून घ्यावीत असा विचार मनात आला. मुलांना जशी चित्रे काढावीशी वाटतील तशी काढू दे आणि मग त्यातूनच मुलांच्याच चित्रांनी सजलेले 'तळ्यातला खेळ' हे पुस्तक आकाराला आले. आपटे वाचन मंदिर, इचलकरंजीचा राज्यस्तरीय उत्कृष्ट बालवाङ्मयाचा पुरस्कार या पुस्तकाने पटकावला. मुलांसाठी लिहिलेल्या कवितांना मुलांनीच काढलेली चित्रे असा अभिनव उपक्रम खूप यशस्वी झाला.

मुलांना मराठी भाषेची गोडी लागावी, ती वाढावी यासाठी मी 'शब्दांची नवलाई' हा बालकवितासंग्रह लिहिला. मराठी व्याकरणाचा काही भाग अत्यंत सोपा करून कवितेतून मांडला. अनेकांना तो भावला. या पुस्तकाला दीर्घ अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिणारे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत म्हणतात, 'एकनाथ आव्हाड 'शब्दांची नवलाई' हा आगळावेगळा बालकवितासंग्रह घेऊन बालवाचकांच्या भेटीला येत आहेत. 'आगळावेगळा' यासाठी; की बालकविता म्हटली, की वाचकांना पशुपक्षी, शाळा, अभ्यास, सुट्टी, जादूगार, राक्षस, परी हेच ठरावीक विषय आठवतात. एकनाथ आव्हाड यांनी बालकवितेला पारंपरिक चौकटीतून मुक्त केले आहे, याची साक्ष 'शब्दांची नवलाई' हा कवितासंग्रह वाचताना पटते. त्याच त्या विषयांवर अनेक कवींनी कविता लिहिल्यामुळे बालकविता निरस होते की काय, अशी शंका यायला लागली आहे. आजचा बालवाचक डिजिटल युगात वावरतो आहे. त्याची कल्पनाशक्ती अफाट आहे. आमचे बालसाहित्यिक जर आपल्या बालपणीच्या बालकांना गृहीत धरून जुन्याच विषयांवर चाकोरीबद्ध बालकविता लिहीत असतील, तर ती बालकविता आवर्तात अडकण्याची भीती व्यक्त केली जाते. ही भीती रास्त आहे.

एकनाथ आव्हाडांनी आजवर बालकवितेत अनेक प्रयोग केले आहेत. 'शब्दांची नवलाई' हा त्यांचा संग्रह म्हणजे मराठी बालकवितेतील प्रयोगशीलतेचा आणखी पुढचा टप्पा होय.'

हा संग्रह अनेकांना आवडला. महाराष्ट्र शासनाने या पुस्तकाला 'बालकवी' हा उत्कृष्ट बालकवितासंग्रहाचा पुरस्कार देऊन गौरविले. या पुस्तकातील उदाहरणादाखल एक कविता अशी...

**आई म्हणते...**

*आई म्हणते संकटाना नेहमीच तोंड द्यावे*
*लहानथोर साऱ्यांशीच तोंड भरून बोलावे,*
*मोठ्यांच्या बोलण्यात कधी तोंड ना घालावे*
*चुकूनही कुणावर कधी तोंडसुख ना घ्यावे*
*वायफळ बडबडीत कशाला, तोंडाची वाफ दवडावी?*
*फसवून कुणाच्या तोंडाला, पानं का पुसावी?*
*तोंडाला तोंड देत कधी, भांडत ना बसावे*
*विश्वासघात करून कुणाला, तोंडघशी ना पाडावे*
*कशाला कुणाशी उगाचच, तोंड सोडून बोलावे*
*वाईट कडू बोलण्यापेक्षा, तोंडाला कुलूप घालावे*
*आई आमची सतत असे, सांगते बरंच काही*
*तोंडदेखले मात्र ती, कधीच बोलत नाही*

पुस्तकाच्या संदर्भातील आणखी एक सुंदर आठवण अशी, की माजलगाव येथील महात्मा फुले माध्यमिक शाळेच्या दर्शनी भिंतीवर याच पुस्तकातील 'चिन्हांचा खेळ' ही कविता ऑइलपेंटने लिहिली आहे. मुले, पालक येता–जाता ती कविता वाचतात. ती कविता अशी...

*वाक्य पूर्ण झाले, हसून सांगे पूर्णविराम*
*दोन छोट्या वाक्यांना, सहज जोडे अर्धविराम*
*एका जातीच्या शब्दांमध्ये, येऊन बसे स्वल्पविराम*
*वाक्याच्या शेवटी बोले, तपशिलात अपूर्णविराम*

*प्रश्न पडतो तेव्हा, धावून येई प्रश्नचिन्ह*
*भावनांच्या रसात बुडून, उभे राही उद्गारचिन्ह*
*शब्दावर जोर पाडी, अवतरणचिन्ह एकेरी*
*कुणी बोले तिथेच दिसे, अवतरणचिन्ह दुहेरी*
*कुठे घ्यावा विराम हे, चिन्ह सांगे अचूक*
*चिन्हांच्या सोबतीने, वाक्य लिहू बिनचूक*
*चिन्ह वगळून वाक्य, कसे ओंगळवाणे दिसे*
*चिन्हांमुळेच वाक्याचा, अर्थ मनी ठसे ।*

असे अनेक आनंदाचे क्षण मला बालसाहित्याने दिले.

माझ्या बालसाहित्य लेखनामुळेच बालभारती पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळावर सदस्य म्हणून दोन वेळा काम करण्याची संधी मला मिळाली; एवढेच नव्हे, तर डॉ. विजया वाड, गिरिजा कीर, मंगेश पाडगावकर, शिरीष पै, मधु मंगेश कर्णिक, माधवी कुंटे यांचाही अपार स्नेह लाभला. 'आव्हाड तुमचे दरवर्षी बालकवितेचे एक पुस्तक मीच काढणार!' असे हट्टाने म्हणणारा तानाजी सावंतसारखा कथामालेचा ज्येष्ठ कार्यकर्ता माझ्या पुस्तकांमुळे माझ्याशी जोडला गेला.

मला एक प्रसंग आठवतोय, शशिकलाताई आगाशे उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार माझ्या 'अक्षरांची फुले' या पुस्तकाला जाहीर झाला होता. त्या वेळी तो पुरस्कार घेण्यासाठी व तिथल्या मुलांशी संवाद साधण्यासाठी मी बुलढाण्यातील भारत विद्यालय या शाळेत गेलो होतो. शाळेच्या प्रांगणात प्रवेश केला आणि मी एकदम अवाक् झालो, कारण तिथल्या शाळेच्या भिंतीवरच्या दर्शनी फलकांवर मुलांनीच त्यांच्या अक्षरांत माझ्या 'अक्षरांची फुले' या पुस्तकातील अनेक कविता रंगीबेरंगी खडूने लिहून काढल्या होत्या. त्या कवितांवर अनेक चित्रे मुलांनीच रेखाटली होती. अनेक कवितांना मुलांनीच चाली बांधल्या होत्या. कार्यक्रम सुरू झाला. मुलांनीच सर्व कार्यक्रमाचा ताबा घेतला होता. मला कळले होते, या पुरस्कारासाठी मोठी मंडळी नाही तर, चक्क मुलेच पुस्तक वाचून, पारखून पुस्तकाची निवड करतात. मुलांचे पुस्तक मुलांनीच पुरस्कारासाठी निवडावे हे मला विशेष वाटले. मुलांना हे पुस्तक आपले वाटले यातच सारे काही आले. मुलांचा उत्स्फूर्त, बोलका, कृतिशील प्रतिसाद खूप काही सांगून गेला. एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते, मुलांनीच माझा हात लिहिता ठेवला. त्यांनीच माझ्या बालसाहित्याला खरा बहर आणला. त्यांची आनंदाची बाग बालसाहित्यातून फुलवता फुलवता मीही यातून फुलत गेलो!

◈◈◈

---

(पृष्ठ क्र. ९ वरून)

**(११) स्त्री शक्तीचे महत्त्व :** राजमाता जिजाबाई, सावित्रीबाई फुले, राणी लक्ष्मीबाई, डॉ.आनंदीबाई जोशी, इंदिरा गांधी, सुनिता विल्यम् यांच्या कार्याची माहिती देणारे सादरीकरण करणे, तसेच स्त्रीच्या विविध भूमिका दर्शवणारे विषय उदा. बहीण, पत्नी, आई, शिक्षिका इत्यादी.

**(१२) निसर्गरचनेवर आधारित विषय :**
उदा. : इंद्रधनुष्य, नवग्रह (मी मंगळ बोलतोय) सात दिवसांची कहाणी, ऋतूंचे मनोगत इत्यादी.

**(१३) सामाजिक हित जपणारे विषय :**
उदा. : अहिंसा, वृत्तपत्रसंस्थेचे महत्त्व, न्यायसंस्थेचे महत्त्व, लोकशाहीचे महत्त्व अशा प्रकारचे विविध विषय निवडून मनोरंजनातून व्यक्तिमत्त्व विकासाचे उद्दिष्ट साध्य करता येईल. वर दिलेले विषय हे वानगीदाखल आहेत. कल्पक शिक्षक स्थानिक परिस्थितीनुसार त्यामध्ये भर घालून स्नेहसंमेलने अधिक परिणामकारक करू शकतात. शाळा केवळ शाळा न राहता त्या प्रयोगशाळा व्हाव्यात हीच कामना!

◈◈◈

# मुले अनुकरणप्रिय असतात...

**माधुरी पाटील**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोडाळे,
ता. इगतपुरी, जि. नाशिक.

*कोणतेही मूल त्याच्या आसपासच्या वातावरणाचे आणि पालकांच्या बोलण्या-चालण्याचे निरीक्षण करून शिकत असते. पालकांच्या चांगल्या-वाईट सवयींचा त्याच्यावर परिणाम होत असतो. त्यामुळे पालकांनी मुलांच्या संस्कारक्षम वयात आपल्या वागण्यातून त्यांच्यासमोर आदर्श घालून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वागण्यातून मुलांवर सुसंस्कार करणे आवश्यक आहे.*

*याबाबतचा तपशीलवार आढावा या लेखात घेण्यात आला आहे.*

मुले अनुकरणप्रिय असतात हे आपण जाणतो, घरात ते अनुभवतो आणि बघतोदेखील. समजा एकत्र कुटुंबात मुले वावरत असतील आणि घरातील पुरुष मंडळीत एखादे व्यसन असेल, तर घरातील ही मंडळी मुलांसमोर जेव्हा व्यसनाधीन क्रिया करत असतात, तेव्हा घरातील लहान मुले हा प्रकार अगदी जवळून बघत असतात; इतकेच नाही तर ते बघून मनात साठवतदेखील असतात आणि यातून ते व्यसन करून बघण्याची इच्छा त्यांना होते. घरातल्या लोकांनी हे करूच नये. निदान या गोष्टी मुलांदेखत होणार नाहीत याची तरी खबरदारी पालकांनी घेतली पाहिजे, खरेतर मुलांसमोर करणार नाही हे पालकांनीच मनाशी ठरवले पाहिजे. त्यांची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे हे जाणले पाहिजे.

आपण लहान मुलांना जेव्हा घरात खेळवत असतो, तेव्हा त्यांना शिकवतदेखील असतो. उदाहरण द्यायचेच म्हटले, तर आपण मुलांना छोटे छोटे प्रश्न विचारतो- बाळा तुझे नाक दाखव? तुझे तोंड दाखव? तुझे कान, डोळे, हात, पाय, डोके, दात, जीभ दाखव? इतकेच नाही, तर त्याचबरोबर आजोबा कसे चालतात रे? आजोबांचे डोळे कसे आहेत? कोण व्यक्ती व्यसन कसे करते? असे प्रश्न गमतीत विचारतात. मुले या सर्व प्रश्नांची उत्तरे अगदी त्याच तालात कृती करून देतात, तेव्हा त्यांच्या त्या छोट्या छोट्या क्रिया पाहून आपल्याला त्यांचे कौतुक वाटते, आपल्याला हसूदेखील येत असते.



आपण बोलूनही जातो, वा! किती हुशार आहे बाळ. अगदी बरोबर लक्षात ठेवतो आणि तसेच करतो, पण याच क्रिया तो यापुढेही कायमस्वरूपी लक्षात ठेवतो आणि याच गोष्टी करण्याची धडपड करतो हे आपण लक्षात घेतच नाही. तेव्हा आपण मुलांना असे प्रश्न न विचारता, त्यांच्या बालबुद्धीला संस्कार मिळतील असे प्रश्न विचारा. थोरांच्या गोष्टी सांगा; जेणेकरून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित नेहरू अशा अनेक थोर नेत्यांचे आदर्श त्यांच्यापुढे राहतील आणि येणाऱ्या सुजाण भावी पिढीचा या देशाला नक्कीच उपयोग होईल.

एखाद्या वेळेस काही मुले सतत गैरहजर असतात आणि अचानकपणे पुन्हा कधीतरी शाळेत येतात; तेव्हा

जर का या मुलांना विचारले, 'का रे बाळा? इतके दिवस कुठे होतास?' तर त्यांची कारणे ऐकून खरोखर वाईट वाटते. घरातल्या वातावरणामुळे ती शाळेत येत नाहीत. मुले सांगतात, की पप्पा दारू पिऊन येतात व आईला मारतात, त्यासोबत आम्हांलादेखील मारतात, घरातील वस्तूंची फेकाफेक करतात. हे जे प्रसंग ते रोजच्या रोज बघत असतात, त्यामुळे ही लहान मुले घाबरून जातात व त्याचा त्यांच्या बालमनावर वाईट परिणाम होतो.

मला शेवटी एक गोष्ट पालकांना आवर्जून सांगावीशी वाटते, की आपण जेव्हा मुलांना शाळेत पाठवता, त्या वेळी त्यांना खाऊ आणि खर्चासाठी दहा–वीस रुपये देत असता, पण खर्च केलेल्या पैशांचा त्याला घरी आल्यावर हिशोब विचारला जातोच असे नाही. तू काय खरेदी केलेस? काय खाल्लेस? हेदेखील विचारले जात नाही, हे विचारले गेले पाहिजे. अनुभवातून सांगते, की बऱ्याच वेळा मुले दिलेल्या पैशातून च्युईंगम व गुटखा खातात आणि त्यातूनच त्यांना नकळत व्यसन लागते. मुलांची काळजी शिक्षक तर घेतातच; पण पालकांनीसुद्धा घेतली पाहिजे. मुलांना पैसे साठवण्यासाठी एक गल्ला घेऊन द्या. रोज दिलेले पैसे आपल्यासमोर गल्ल्यात टाकायला सांगा आणि त्यांना आवश्यक गोष्टी स्वतः खरेदी करून द्या; म्हणजे हे प्रश्न पुढे कधीही निर्माण होणार नाहीत असे मला वाटते. मी माझ्या शाळेतदेखील हा उपक्रम राबवत आहे, त्याचे नाव आहे 'एक मुलगा, एक गल्ला'. प्रत्येक मुलाचे नाव असलेला एक एक गल्ला वर्गात असतो. खाऊसाठी मिळालेले पैसे मुले आपापल्या गल्ल्यात साठवतात. याचा मुलांना चांगला फायदा झाला आहे. मुले साठवलेल्या पैशातून शालेय वस्तू खरेदी करतात, पुस्तके असतील, वह्या असतील किंवा शालेय उपयोगी वस्तू असतील, त्या साऱ्या या पैशातून खरेदी केल्या जातात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुले कोणतीही छोटी–मोठी शाळेची फीसुद्धा त्यातून भरतात. शाळेची सहल निघते तेव्हा गल्ल्यातील पैशाचाच उपयोग मुले सहलीची फी भरण्यासाठी करतात. ही सवय मी माझ्या मुलांना पहिलीपासून लावली. त्याची कल्पनाही पालक मीटिंगमध्ये सांगितली, इतकेच नाही, तर गल्ला जेव्हा फोडला जातो तेव्हा पालकसुद्धा उपस्थित असतात. या उपक्रमात सहभागी मुलांना लहानपणापासून बचतीची सवय लागते, व्यवहार समजतो आणि मुलांना काटकसरीने कसे वागावे, पैसा कसा साठवावा, त्याचा योग्य ठिकाणी वापर कसा करावा हे कळते. या चांगल्या सवयी ल AAAहान वयात लागणे केव्हाही चांगलेच.

◈◈◈


## वर्गणीदार होण्यासाठी

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/– (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# शालेय मंत्रिमंडळ : समूह संस्कारांचा एक मार्ग

**रामचंद्र पाटील**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करुंगली,
ता. शिराळा, जि. सांगली.
भ्रमणध्वनी : ९७३०२७७०५७

*प्राथमिक स्तरावरील मुले अत्यंत संवेदनशील असतात. थोडी लाजरी-बुजरी, भित्री असतात. अशा विद्यार्थ्यांना खुलवण्यासाठी स्वच्छंदी व खुले वातावरण निर्माण करणे आवश्यक असते. त्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवणे आवश्यक असते. याचाच एक भाग म्हणून 'शालेय मंत्रिमंडळ' या उपक्रमाचा कसा उपयोग झाला याबाबत लेखकाने या लेखात विस्ताराने सांगितले आहे. या अनुभवाचा फायदा इतरही शाळांना करून घेता येईल असे वाटते.*

शाळा म्हणजे समाजाचे लघुरूपच. शाळेत बालवयात अनेक संस्कार होत असतात. विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते. ज्या वेळी विद्यार्थी शाळेमध्ये प्रवेश घेतो, त्या वेळी त्याच्या बालमनावर घर आणि समाजातील विविध विचारांचा पगडा असतो. शाळेत प्रवेश घेतलेला विद्यार्थी सरासरी सहा ते सात महिने अंतर्मनातील रचित ज्ञानाचे दरवाजे खुले करीत नाही. आईचे कोमल मन असलेला एखादाच शिक्षक अशा प्रकारचे दरवाजे उघडण्याचा प्रथमपासूनच जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे वर्तन हे बहुतेक वेळा लाजरे-बुजरे, थोडेसे भित्रे असलेले दिसून येते. हे लहान विद्यार्थी फुलपाखरांसारखे असतात. या विद्यार्थ्यांना स्वच्छंदी वातावरणाची गरज असते. स्वच्छंदी वातावरणामुळे विद्यार्थी आपल्या अंतर्मनाचे कप्पे स्वतःहून उघडत असतात. त्यातूनच विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी लक्षात येतात. बालवयातील तो आलेख वयपरत्वे वाढत जातो. त्यामध्ये अनेक प्रकारचे बदल होत जातात.



प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची वयानुसार विचार करण्याची एक विशिष्ट पद्धत असते. याच वयामध्ये त्यांचा इंद्रिय-विकास होत असतो. या वयात अनेक इंद्रिय-संस्कार दृढ होतात. विद्यार्थी अनेक गोष्टी, प्रसंग पाहत असतात. या वयातील अनेक गोष्टी, प्रसंग दीर्घकाळ विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहतात.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे मन आणि मनातील विचार शाळेला समजून घ्यायचे असतात. अर्थातच कोणतीही गोष्ट त्यांच्या मनाविरोधात घडली, तर त्याचे दूरगामी परिणाम दिसून येतात. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर असे लक्षात येते, की प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना स्वयंप्रेरित, स्वयंशासित राहणे खूपच आवडते. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी व त्यांच्या विविध प्रकारच्या सवयी या बाबी विचारात घेऊन शिक्षक आपल्या दैनंदिन अध्ययन-अध्यापनात आवश्यक ते बदल करत असतात.

शालेय स्तरावरील मंत्रिमंडळ या संकल्पनेचा बालसंस्कारासाठी उपयोग होऊ शकतो, आपल्या

प्रजासत्ताक राष्ट्रात लोकशाही पद्धती आहे. त्याचा परिचय या शालेय मंत्रिमंडळ उपक्रमातून होतो. शालेय मंत्रिमंडळ व त्याची मुख्य संकल्पना काय आहे याची राबवणूक, तसेच त्याची लोकशाही पद्धतीने निर्मिती कशी करावयाची याची माहिती शाळेतील सर्व विद्यार्थी समूहाला आम्ही करून दिली.

### गरज व महत्त्व :

शालेय मंत्रिमंडळ ही संकल्पना शाळेतील विद्यार्थी समूहाला समजून दिल्यानंतर तिचा परिणामकारक प्रभाव विद्यार्थिवर्तनावर कसा पडतो याचा ऊहापोह होणे महत्त्वाचे असते.

जबाबदारीने कसे वागावे हे समजले पाहिजे. जबाबदारी आणि जीवन यांचा समन्वय झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक समर्पणाची भावना तयार होते. भित्रेपणा, लाजरे-बुजरेपणा कमी होऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

### उपक्रमाची उद्दिष्टे :

(१) शाळा आणि समाजाप्रति विद्यार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना वाढीस लावणे.

(२) विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.

(३) शिक्षक-विद्यार्थ्यांमधील समन्वय वाढीस लावणे.

(४) विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांची रुजवणूक करणे.

(५) विद्यार्थ्यांमधील विविध प्रकारच्या जाणिवांचा बोध करून देणे.

### कार्यपद्धती :

शाळेमध्ये मंत्रिमंडळ तयार करण्याच्या संकल्पना या अनुषंगाने शिक्षक-विद्यार्थी समन्वय असणे गरजेचे असते. मंत्रिमंडळ व त्याचे वास्तव रूप यांविषयी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली.

मंत्रिमंडळात मंत्रिपदे व त्यांची कामाची जबाबदारी या गोष्टींना महत्त्व असते. जसे की, मुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री, आरोग्य मंत्री, शिक्षक-विद्यार्थी समन्वय मंत्री, दैनिक परिपाठ मंत्री.

### प्रचार व निवडणूक :

प्रचारयंत्रणा व त्याच्या उभारणीसाठी साधारण १० दिवसांचा कालावधी निश्चित करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रचार यंत्रणा कशी राबवावयाची याची माहिती दिली. या अगोदर शाळेतील जाणकार, हुशार, धीट विद्यार्थ्यांची नोंद घेऊन त्यांना या सर्व प्रक्रियेची माहिती दिली. नंतर या मुलांच्या समूहगटाला एकूण दोन गटात विभागून, त्यांना लॉटरी पद्धतीने पॅनेलची नावे दिली. लॉटरी पद्धतीनेच चिन्ह वाटप करून प्रचार यंत्रणा लोकशाही पद्धतीने कशी राबवायची याची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांच्या त्या दोन्ही गटांना करून दिली. सर्व बाबींची तालीम करून घेतली. इतरांपेक्षा वेगळे कार्य करण्याची जबाबदारी आपल्याला मिळाल्यामुळे अशा विद्यार्थ्यांमध्ये नवा हुरूप आला. त्यांच्या दैनंदिन वर्तनात प्रचंड बदल झालेले दिसून आले.

### प्रत्यक्ष निवडणूक व निकाल :

शालेय मंत्रिमंडळ व त्याची निवडणूक प्रक्रिया या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांसाठी थोड्या कठीण होत्या. निवडणूक प्रक्रिया एका निश्चित तारखेला चांगल्या सुसज्ज नियोजनाने करून घेतली. निवडणुकीचा निकाल हा त्याच दिवशी जाहीर करण्याचे ठरले. शालेय मंत्रिमंडळाच्या दोन्ही पॅनेलसमोर मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली हा निकाल जाहीर करण्याचे ठरले. कडक शिस्तीमध्ये निकाल तयार करून स्वतः मुख्याध्यापकांनी तो सर्वांच्या समोर जाहीर केला. निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांचे सांत्वन करून विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

**खातेवाटप व शपथविधी :**

शालेय मंत्रिमंडळामधील विजयी पॅनेलमधील सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापकांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांच्या समोर जाहीर अभिनंदन करून पुढील कामासाठी त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन केले.

यानंतर पॅनेलमधील सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांनी गोपनीयतेची शपथ दिली. या वेळी मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना खातेवाटप करून त्यांच्या कामाबद्दलची, त्यांच्या जबाबदारीची माहिती दिली. या वेळी पराभूत झालेल्या पॅनेलमधील प्रमुख विद्यार्थ्याची विरोधी गट नेता म्हणून निवड केली. विरोधी मंडळ तयार करून त्यांना त्यांच्या कामाबद्दलची तसेच जबाबदारीची माहिती दिली.

**शालेय मंत्रिमंडळाची स्थापना व प्रत्यक्ष राबवणूक :**

यानंतर शालेय मंत्रिमंडळाला मुख्याध्यापक व शिक्षकांनी पूर्ण संमती देऊन पाठिंबा दर्शविला. सर्व विद्यार्थ्यांना मंत्रिमंडळाच्या आज्ञा व आदेश पाळण्याचे आवाहन करण्यात आले.

शालेय मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांनी आपापली खाती व कामाची जबाबदारी स्वीकारली. प्रत्येक मंत्र्याच्या कामाची वाटणी झाली. वाटणी झाल्याप्रमाणे विद्यार्थी आपापल्या कामासाठी पुढाकार घेऊ लागले. शाळेतील प्रत्येक दिवशी परिपाठात चांगल्या कामाची नोंद घेतली जाऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. आपल्या कामाची दखल घेतली जाते, कौतुक होते हे पाहून मंत्रिमंडळातील सर्वच जण जबाबदारीने उत्तम रीतीने काम करण्यासाठी धडपडू लागले.

बालवयातील संस्कार व शालेय मंत्रिमंडळ हे सर्व विद्यार्थी विकासासाठी पूरक ठरले. विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी रुजत गेल्या. शाळेची, अभ्यासाची भीती कमी झालेली दिसून आली. अर्थातच शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये समन्वय वाढलेला दिसून आला. शाळा, पालक व समाज अशा उपक्रमांमुळे एकत्र येण्यासाठीचा मार्ग तयार झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये एकवाक्यता दिसायला लागली. शिक्षकांच्या अनुपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी शालेय वातावरण सुंदर राखण्याचा प्रयत्न केला. यातच या उपक्रमाचे यश दिसून आले.

◈◈◈

**(पृष्ठ क्र. १४ वरून)**

(सस्टेनेबल डेव्हलपमेंट) मधील लक्ष ४ सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण व लक्ष ५ मधील लिंगसमानता यांच्याशी जोडलेले आहे. भारतातील स्त्री–शिक्षणाचा आलेख हा वाढत आहे. स्त्री–शिक्षण हे स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, न्यायिक जीवन सुखदायक बनवते. स्त्री–शिक्षणाच्या वाटचालीमुळे भारतीय व्यवस्थेत स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण हे गल्ली ते दिल्ली असे वाढले आहे. भारतीय महिलांनी सर्व क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटवला आहे. स्त्रीला मिळालेल्या शिक्षणामुळे जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश अशा सर्व शृंखला मोडून पडतात, आणि स्त्री भारताची पंतप्रधान, राष्ट्रपती असा यशस्वी प्रवास करू शकते. त्यामुळे श्रीमती मिशेल ओबामा यांच्या शब्दात सांगायचे म्हटले तर,

'No Country can ever truly flourish if it stifles the potential of its women and deprives itself of the contributions of half of its citizens.

स्त्री देशाचा, समाजाचा खऱ्या अर्थाने गौरव वाढविते. त्यामुळे स्त्री शिक्षण हे निरंतर चालावे याकरिता आपण सर्वांनी प्रयत्न करणे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

◈◈◈

# आपल्या राष्ट्रपती : मा. श्रीम. द्रौपदी मुर्मूजी

**वृंदा शिंदे**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,
गोळीबार मैदान, पुणे.
भ्रमणध्वनी : ७२१९५३१२७१

*आज आपल्या देशाच्या प्रमुख पदावर म्हणजेच राष्ट्रपती पदावर एक महिला मोठ्या आत्मविश्वासाने विराजमान झाल्या आहेत. सध्या सर्वच क्षेत्रांत शिक्षण, कौशल्य व आत्मविश्वास याच्या जोरावर महिला आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत; द्रौपदी मुर्मू या याचेच ठळक उदाहरण आहेत.*

*भारताच्या राष्ट्रपती माननीय श्रीम. दौपदी मुर्मू यांचा झोपडी ते राष्ट्रपती पदापर्यंतचा लक्षणीय प्रवास या लेखात वाचावयास मिळेल.*



लोकशाहीप्रधान असणाऱ्या माझ्या भारत देशात गरीबदेखील राष्ट्रपती बनण्याचे स्वप्न पाहू शकतो आणि ते पूर्णसुद्धा करू शकतो हे माझ्याकडे पाहता लक्षात येईल' असे म्हणणाऱ्या आपल्या भारताच्या १५व्या राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू.

राष्ट्रपती म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावतील, असा सर्वांनाच विश्वास असणाऱ्या या आदिवासी समाजातील कन्येला राष्ट्रपती पदावर बसवून भारताने इतिहास घडविला आहे. गरीब, दुर्बल घटक, तसेच तळागाळातील व्यक्तींसाठी आशेचा किरण बनलेल्या द्रौपदी मुर्मू यांचा झोपडीपासून ते राष्ट्रपतीभवनपर्यंतचा जीवन प्रवास खरेच खूप खडतर आणि तितकाच प्रेरणादायी असाच आहे.

द्रौपदी मुर्मू यांचा जन्म २० जून, १९५८ रोजी ओरिसातील मयूरभंज जिल्ह्यातील बडीपोसी गावात झाला. संथाल नावाच्या आदिवासी समाजात जन्म घेतलेल्या द्रौपदी मुर्मू यांचे वडील बिरांची नारायण टुडू आणि आजोबा हे पंचायती राजप्रणाली अंतर्गत गावप्रमुख होते.

द्रौपदी मुर्मू यांनी केबीएचएस उपरबेडा स्कूल मयूरभंज या शाळेतून आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. रमादेवी वूमन कॉलेज, भुवनेश्वर ओरिसा या कॉलेजमधून त्यांनी बी.ए.ची डिग्री मिळवली. कॉलेजमध्ये जाणाऱ्या त्या काळातील आदिवासी समाजातील त्या पहिल्या महिल्या होत्या. कॉलेजमध्ये असताना श्यामचरण मुर्मू यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना लक्ष्मण, सिप्पन ही २ मुले आणि इतिश्री ही एक मुलगी.

द्रौपदी मुर्मू यांनी ओरिसा सरकारच्या विद्युत विभागात कनिष्ठ सहायक म्हणून काम केले. त्यानंतर १९९४ साली त्यांनी रायरंगपूर येथील 'अरबिंदो इंटिग्रल एज्युकेशन सेंटर'मध्ये शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. १९९७ पर्यंत त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. शालेय जीवनापासूनच त्यांच्या अंगी नेतृत्व गुण होता. त्यांनी अनुसूचित जाती, जमातींसाठी व महिला सक्षमीकरणासाठी खूप काम केले. १९९७ मध्ये रायरंगपूरच्या नगरसेवक म्हणून त्या निवडून आल्या. नंतर भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जमाती मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा म्हणून त्यांची निवड करण्यात आली. नगरसेविका, आमदार, राज्यसरकारमध्ये मंत्री, राज्यपाल अशा बऱ्याच राजकीय पदांवर त्यांनी काम

केले. २००० ते २००९ रायरंगपूर विधानसभा मतदार संघातील आमदार म्हणून त्यांनी काम पाहिले.

६ मार्च, २००० ते ६ ऑगस्ट, २००२ पर्यंत वाणिज्य आणि वाहतूक राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ६ ऑगस्ट, २००२ ते १६ मे, २००४ या कालावधीत मत्स्य आणि पशु-संसाधन विकास राज्यमंत्री म्हणूनदेखील त्यांनी काम केले आहे. २००७ मध्ये त्यांना 'सर्वोत्कृष्ट आमदार' म्हणून ओरिसा विधानसभेने 'नीलकंठ पुरस्कार' देऊन सन्मानित केले. त्या झारखंडच्या पहिल्या महिला राज्यपाल होत्या. १८ मे, २०१५ ते १२ जुलै, २०२१ पर्यंत त्या राज्यपाल होत्या.

यशवंत सिन्हा यांना पराजित करून, राष्ट्रपती पदाची निवडणूक जिंकून त्या देशातील पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती ठरल्या आहेत. या विजयानंतर सर्वांत कमी वयामध्ये राष्ट्रपती होण्याचे रेकॉर्ड त्यांच्या नावे नोंदविले गेले. अशा या मयूरभंज ओरिसाच्या 'दीदी' ज्या 'शाळेत वर्गाच्या मॉनिटर होत्या, त्या आता देशाच्या मॉनिटर आहेत', असे त्यांच्या गावातील लोक अभिमानाने म्हणतात.

अनेक संकटांचा सामना करत त्या या पदापर्यंत पोहोचल्या आहेत. त्यांच्या आयुष्यात अशा अनेक गोष्टी घडल्या, ज्याने त्या कोलमडल्या होत्या; परंतु पुन्हा नव्या उमेदीने उभे राहून आयुष्यात पुढे जाण्याचा मार्ग त्यांनी निवडला आणि सर्वांना दाखवून दिले की...

*कोमल है, कमजोर नहीं, शक्ती का नाम तो नारी है।*

राष्ट्रपती मुर्मू यांनी २००९ ते २०१५ या अवघ्या ६ वर्षांत पती, २ मुले, आई, भाऊ असे जवळचे नातेवाईक गमावले. २००९ मध्ये लक्ष्मण मुर्मू हा त्यांचा २५ वर्षांचा तरुण मुलगा, मित्रांसोबत बाहेरून फिरून आला आणि रात्री झोपला, तो सकाळी उठलाच नाही. २०१३ मध्ये लहान मुलगा सिप्पन मुर्मू अपघातात निधन पावला. त्या आधी त्यांचे पती श्यामचरण यांचेही कार्डियाक अ‍ॅरेस्टने निधन झाले. या आघातांनी त्या नैराश्येच्या गर्तेत गेल्या. राजकारणात त्यांना रस वाटेना. त्या वेळी त्यांना साथ मिळाली अध्यात्माची व ब्रह्मकुमारी यांची. ध्यान-योग, शिवभक्ती यांमुळे त्या नैराश्यातून बाहेर आल्या आणि पुन्हा राजकारणात आल्या. राज्यपाल म्हणून २०१५ मध्ये त्यांनी जबाबदारी स्वीकारली. देशसेवेसाठी त्यांनी पुन्हा स्वतःला झोकून दिले. नारीबद्दल म्हटले गेलेले,

*वार नाही, तलवार आहे...*
*ती समशेराची धार आहे...*
*स्त्री म्हणजे अबला नारी नाही...*
*ती तर धगधगता अंगार आहे...*

हे अगदी त्यांच्या बाबतीत सार्थ आहे. राष्ट्रपती पदावर येताच त्यांनी सांगितले, 'मला बिरसा मुंडा यांच्याकडून देशसेवेची प्रेरणा मिळाली आहे. मी जनकल्याण आधी पाहणार आणि 'एक भारत श्रेष्ठ भारत' हे कार्य पूर्ण करणार. महिला सक्षमीकरण, तरुण युवक यांच्या विकासासाठी प्रयत्न करणार.' त्या ब्रह्मकुमारी यांचे ट्रान्सलाईट आणि शिव पुस्तक नेहमी आपल्याबरोबर ठेवतात. भल्या पहाटे ३.३० वाजता ध्यानधारणा, योग याने त्यांची दिनचर्या सुरू होते. वेळ फुकट घालवणे त्यांना अजिबात आवडत नाही. शाकाहारी व कांदा-लसूण विरहित आहार त्या घेतात. चेन्नापोडा ही ओरिसाची मिठाई त्यांना फार आवडते. त्यांचा पेहराव असणारी साडीदेखील हातमागावर विणलेली असते. साधी राहणी आणि उच्चविचारसरणी या तत्त्वानुसार त्या आपले जीवन जगत आहेत. त्यांचे कर्तृत्व आकाशाला गवसणी घालणारे असेच आहे. म्हणूनच त्यांच्याविषयी असे म्हणावेसे वाटते,

*''इस सृष्टी की शान है ये नारी,*
*जगत जननी महान है नारी।''*

# गोष्टींची शाळा

**बालाजी जाधव**
जि. प. प्राथ. शाळा विजयनगर (पर्यती)
ता. माण, जि. सातारा
भ्रमणध्वनी : ७५८८६११०१५

*"गोष्ट ही अबालवृद्धांना आवडणारी गोष्ट आहे. गोष्टींच्या माध्यमातून पुस्तकी शिक्षण देणे शक्य आहे, हे या लेखाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. शिकण्याचा व शिकवण्याचा सहजसोपा उपाय म्हणून गोष्टींचा अत्यंत प्रभावी वापर लेखकाने स्वतः शाळेत केला आहे. यातूनच 'गोष्टींची शाळा' हा अभिनव उपक्रम सुरू झाला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून चित्रे किंवा शब्दांवरून गोष्ट तयार करण्याबरोबरच गणित, इतिहास, परिसर अभ्यास या विषयांच्याही गोष्टी तयार करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. या अभिनव उपक्रमाची ओळख या लेखात करून देण्यात आली आहे."*

जवळपास ३ वर्षे झाली; मी पहिली ते चौथी चारही वर्गांना एकटाच शिक्षक व वर्गात ४० विद्यार्थी. मग काय, दिवसभर तारेवरची कसरत. मी अधूनमधून मुलांना कंटाळा येऊ नये म्हणून कधी प्रोजेक्टरवर, तर कधी स्वतः गोष्ट सांगायचो. काही दिवसांनंतर जर त्यातील एखादा संदर्भ आला, तर मुलांना तो सहज आठवायचा. मग माझ्या लक्षात आले, की 'गोष्ट' मुलांना आवडते. त्याच्याच माध्यमातून अध्यापन करायचे. शिकवण्याचा व शिकण्याचा एक सहज सुलभ उपाय सापडला आणि मग सुरू झाली आमची 'गोष्टींची शाळा'.

**समस्या :**

(१) एकच शिक्षक असल्याने चारही वर्गांना अध्यापन करणे ही सर्वांत मोठी समस्या होती.

(२) सर्व विद्यार्थ्यांना ऐकून, वाचून पाठ समजत नव्हते, विद्यार्थी घटक विसरून जायचे.

(३) लॅपटॉप व कॅमेऱ्यासमोर वाचलेले पाठ, ऐकलेल्या गोष्टी रेकॉर्ड करताना काही जण विसरून जायचे.




(४) काही जण गोष्टी खूप छान सांगायचे, मात्र लेखन करताना खूप कमी आणि छोटी गोष्ट लिहायचे.

(५) स्वतः पाठ किंवा गोष्ट वाचून जशीच्या तशी सांगताना विसरणे, लिहिताना विसरणे हे घडायचे.

(६) पाठोपाठ चित्र किंवा शब्दांवरून गोष्ट तयार करताना अगदी छोटी, कमी वेळेची गोष्ट व्हायची.

(७) भाषा विषयापेक्षा गणित, इतिहास व परिसर अभ्यास या विषयांतील गोष्टी तयार करणे कठीण व्हायचे.

**टप्पे/प्रत्यक्ष कार्यवाही :**

याच्या प्रभावी कार्यवाहीसाठी काही टप्पे केले व त्यानुसार सुरुवात केली :

(१) सुरुवातीला मी भाषा विषयातील पाठाची गोष्ट तयार करायचो व मुलांना सांगायचो. अगदी ५ ते ७ मिनिटांची गोष्ट असायची.

(२) गोष्ट सांगून झाली, की मी विद्यार्थ्यांना डोळे मिटून ती गोष्ट आठवण्यास सांगायचो व त्याप्रमाणे ते कृती करायचे.

(३) त्यानंतर समूहात आठवेल तशी गोष्ट सांगायची असे सांगितले व त्याप्रमाणे काही विद्यार्थी छान प्रकारे गोष्ट आठवून सांगू लागले.

(४) ज्या विद्यार्थ्यांना माझी गोष्ट एकदा ऐकून सांगणे जमत नव्हते, ते गटातील मुलांनी सांगितलेली

गोष्ट ऐकून मग दुसऱ्या, तिसऱ्या प्रयत्नात छान प्रकारे गोष्ट सांगू लागले.

(५) साधारण दोन आठवडे आम्ही हा प्रयोग सुरू ठेवला, पण मला चार वर्गांना वेळ कमी पडू लागला. मग मी इयत्ता तिसरी व चौथीच्या वर्गांना तुम्ही स्वतः पाठ वाचून गोष्ट तयार करू शकता का? असे विचारले व तसा प्रयत्न करण्यास सांगितले.

(६) पाहतो तो काय आश्चर्य! जवळजवळ ७० ते ८० टक्के विद्यार्थी पाठ वाचून त्यापासून गोष्ट तयार करून गटात छानपणे सादर करू लागले. हाच प्रयोग इयत्ता दुसरीसाठीसुद्धा यशस्वी झाला.

(७) काही दिवसांनंतर वाचलेली, ऐकलेली व पाहिलेली गोष्ट मुले सहजपणे सांगू लागली. हे लक्षात आल्यावर आम्ही टॅब देऊन मुलांना त्या गोष्टी ऑडिओ रेकॉर्ड करण्यास सांगितले, पण डिव्हाईस समोर बोलताना पुन्हा अडचणी येऊ लागल्या.

(८) मग तीच गोष्ट कॅमेरा व लॅपटॉपसमोर बसून रेकॉर्ड करण्यास सुरुवात केली. आठवड्यातून एकदा किंवा दोन वेळा सर्व मुले एका वर्गात बोलावून, लॅपटॉपसमोर बसवून, प्रोजेक्टरवर दिसेल अशा गोष्टी सांगण्यास व त्या रेकॉर्ड करण्यास सुरुवात केली. त्यामुळे मोठ्या स्क्रीनवर दिसण्याच्या आनंदात मुले छान छान गोष्टी सांगू लागली.

(९) मग काही दिवसांनंतर आम्ही प्रत्येक विद्यार्थ्याला एक वही दिली व तिला 'गोष्टींची शाळा' असे नाव दिले. वाचलेल्या व ऐकलेल्या गोष्टी सांगून व रेकॉर्ड करून झाल्यावर त्या वहीत लिहिण्यास सांगितले. सांगणे आणि लिहिणे यामध्ये फरक तर होऊ लागला; पण लिहिण्यात खूप कमी यश येऊ लागले.

(१०) सतत सराव झाल्यानंतर यामध्येही प्रगती झाली व सर्व विद्यार्थ्यांनी सर्व पाठ वाचून त्यावर गोष्ट तयार करून, रेकॉर्ड करून वहीत लेखनसुद्धा केले आहे आणि अजूनही करत आहेत.

(११) यापुढे जाऊन चित्रावरून किंवा दोन शब्दांवरूनसुद्धा आमचे विद्यार्थी छान गोष्ट तयार करून सांगतात व लिहितात.

(१२) त्यानंतर आम्ही इतिहास, परिसर अभ्यास व गणितातील काही निवडक घटकसुद्धा गोष्टीद्वारे शिकवण्याचा प्रयत्न करू लागलो व तो यशस्वी होऊ लागला

**कालावधी :**

सर्वसाधारण जुलै ते डिसेंबर असा सहा महिन्यांचा कालावधी सर्व टप्पे पूर्ण करण्यात गेला. आता आम्ही यामध्ये चांगल्याप्रकारे यशस्वी झालो आहोत.

**फलनिष्पत्ती :**

(१) एका शिक्षकाला चार इयत्तांना अध्यापन करताना होणारा त्रास, धावपळ कमी झाली. (२) मुलांचे शिकणे सहज आणि आनंददायी होऊ लागले. (३) मुलांना स्वयं-अध्ययनाची सवय लागली. (४) स्वयं-अध्ययनामुळे विचारशक्ती व कल्पनाशक्ती वृद्धिंगत होऊ लागली. (५) गोष्ट तयार करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत झाले. (६) मुलांमध्ये भाषण, संभाषण कला वाढीस लागली. (७) कॅमेरा, टॅब व लॅपटॉप समोर आपली गोष्ट सहजपणे रेकॉर्ड करण्याचे कौशल्य व धाडस त्यांच्यात निर्माण झाले. (८) गोष्ट लिहिण्यामुळे त्यांचे लेखन-कौशल्य विकसित झाले. (९) भविष्यात चांगले निवेदक, वार्ताहर, लेखक होण्याचा मार्ग मुलांना सापडला.

अशा प्रकारे एकशिक्षकी शाळेसमोर असणारी समस्या गोष्टीसारख्या आवडत्या माध्यमातून सोडवण्यासाठी 'गोष्टींची शाळा' हा उपक्रम राबवून, विद्यार्थ्यांमधील अनेक कौशल्ये विकसित होण्यास साह्य होणारा हा उपक्रम, शेकडो शाळांना उपयुक्त ठरू शकेल असाच आहे असे मला वाटते.

◈◈◈

# रफारापूर्वीच्या व रफारयुक्त अक्षरांचे इकार-उकार

**सलिल वाघमारे**
पुणे.
भ्रमणध्वनी : ९८२०४४१५१३

> *रफार किंवा रेफ म्हणजे 'र्' च्या जोडाक्षराचा एक प्रकार आहे. 'र' हे मराठी वर्णमालेतील वैशिष्ट्यपूर्ण अक्षर आहे. 'र' व्यतिरिक्त इतर सर्व अक्षरांना मधे अर्धा, अक्षराला जोडून व शेवटी स्वतंत्र दंड आहेत. दंड असलेली अक्षरे इतर अक्षरांना जोडताना ती अक्षरे अर्धी करण्याचे दंडाच्या स्थानानुसार वेगवेगळे नियम आहेत. मात्र मराठीतील 'र' या एकमेव अक्षराला दंड नाही; त्यामुळे ते अर्धे कसे करायचे हा प्रश्नच आहे. म्हणून ते अर्धे करून जोडताना वेगवेगळ्या प्रकारे जोडण्यात येते. त्यांपैकीच एक प्रकार म्हणजे रफार किंवा रेफ आहे. या लेखात रफारापूर्वीच्या व रफारयुक्त अक्षरांचे इकार-उकार कसे असतात. याबाबत उदाहरणांसह स्पष्टीकरण देण्यात आले आहे.*

**(मराठी प्रमाणलेखन नियम : लेख – ५)**

मूळ रफारयुक्त शब्द बहुतांश संस्कृत भाषेतील आहेत. रफारयुक्त अक्षरे म्हणजे जोडाक्षरेच असल्यामुळे त्या अक्षरापूर्वीचे इकार-उकार सामान्यतः ऱ्हस्व असतात. मात्र मराठीमधील रफारापूर्वीच्या अक्षरांचे इकार-उकार कसे असतात हे एका नियमात बांधता येत नाही. रफारयुक्त शब्दांतील रफार अनेक वेगवेगळ्या कारणांनी येतात, त्यामुळे अशा अक्षरांतील इकार-उकार विविध प्रकारे ऱ्हस्व किंवा दीर्घ दिले जातात. यासाठी रफार येण्याच्या कारणांचा प्रथम अभ्यास करणे आवश्यक आहे.

(अ) चतुः, दुः आणि निः या विसर्गयुक्त शब्दांचा विशिष्ट शब्दांबरोबर संधी होताना विसर्गाचा लोप होऊन तेथे 'र्' (अर्धा र) होतो. या संधी प्रक्रियेमुळे हा अर्धा र ('र्') पुढील शब्दातील पहिल्या अक्षराला जोडला जातो. या प्रक्रियेमुळे 'विसर्ग' 'र्' संधी' मध्ये काही शब्दांमध्ये रफारयुक्त शब्द तयार होतात. या तीनही शब्दांमधील विसर्गापूर्वीच्या अक्षरांचे इकार मुळातच ऱ्हस्व आहेत, त्यापुढील 'र्' हे व्यंजन दुसऱ्या शब्दातील पहिल्या अक्षराला जोडले जाते व ते रफाराच्या स्वरूपात दर्शवण्यात येते. अशा संधीमुळे निर्माण झालेल्या रफारयुक्त अक्षरापूर्वीच्या अक्षराचे उकार मुळातल्याप्रमाणे ऱ्हस्वच राहतात, त्यामुळे अशा शब्दांतील रफारापूर्वीची अक्षरे ऱ्हस्व असतात.



नियम : विसर्गाच्या मागे अ किंवा आ यांच्याशिवाय कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा लोप होऊन त्याऐवजी 'र्' होऊन संधी होतो. या संधीच्या प्रकाराला 'विसर्ग 'र्' संधी' असेही म्हणतात.

**(१) चतुः – (चतुर्)**

'चतुः' या शब्दाबरोबर काही शब्दांची संधी होऊन तयार झालेले शब्द आपण पाहू. 'चतुः' या शब्दाचा अर्थ ४ (चार) ही संख्या असा आहे. चतुः त्या शब्दाशी संधी होऊन तयार झालेले शब्द चार या संख्येशी संबंधित असतात. त्यामधून चार या संख्येचा बोध होतो.

उदाहरणार्थ, चतुर्थ, चतुर्थक, चतुर्थी, चतुर्थांश, चतुर्थाश्रम, चतुर्दश, चतुर्दशी, चतुर्दंत, चतुर्भुज, चतुर्मुख, चतुर्मास, चतुर्वर्ग, चतुर्वदन, चतुर्वर्ण, चतुर्विध, चतुर्वेद, चतुर्वेदी.

वरील सर्व शब्दांतील रफारापूर्वीच्या अक्षरांचे इकार–उकार ऱ्हस्व आहेत. त्याचे कारण म्हणजे या शब्दांना लागलेल्या चतुः (चतुर्) 'र्' पूर्वीचे इकार–उकार (चतु) ऱ्हस्व आहेत. विसर्ग 'र्' संधी होताना 'र्' पुढील शब्दातील पहिल्या अक्षरावर रफाराच्या स्वरूपात जोडला जातो व त्यापूर्वीच्या अक्षरांचे म्हणजेच 'तु' या अक्षराचा ऱ्हस्व उकार कायम राहतो. उदा., १) चतुः+मुख = चतुर+मुख= चतुर्मुख. २) चतुः+वेद = चुतर+ वेद= चतुर्वेद.

### (२) दुः – (दुर्)

'दुः' या विसर्गयुक्त शब्दाबरोबर 'विसर्ग 'र्' संधी' होऊन तयार होणारे शब्द खालीलप्रमाणे आहेत. 'दुः' या शब्दापासून उलट अर्थाचे शब्द तयार होतात. अशा शब्दांतून नकारात्मक अर्थ निघतो.

**उदाहरणार्थ,**

(१) गुण (चांगला गुण) – दुः + गुण = दुर् + गुण = दुर्गुण (वाईट गुण)

(२) गंध (चांगला वास) – दुः + गंध = दुर् + गंध = दुर्गंध (वाईट वास)

दुर्गंध, दुर्गंधी, दुर्गती, दुर्गम, दुर्गुणी, दुर्घट, दुर्घटना, दुर्जन, दुर्दम्य, दुर्दशा, दुर्दिन, दुर्दैव, दुर्धर, दुर्बल, दुर्बुद्धी, दुर्बोध, दुर्भाग्य, दुर्भिक्ष्य, दुर्मती, दुर्मुख, दुर्लभ, दुर्लक्ष, दुर्लौकिक, दुर्वचन, दुर्वासना, दुर्वृत्ती, दुर्व्यसन, दुर्व्यसनी.

### (३) निः – (निर्)

'निः' या विसर्गयुक्त शब्दाबरोबर 'विसर्ग 'र्' संधी' होऊन तयार होणारे शब्द खालीलप्रमाणे आहेत. 'निः' हा शब्द लागून उलट अर्थाचे शब्द तयार होतात.

**उदाहरणार्थ,**

(१) निः + जीव = निर् + जीव = निर्जीव (जीव नसलेला)

(२) निः + दोष = निर् + दोष = निर्दोष (दोष नसलेला)

निर्गुण, निर्गंध, निर्घृण, निर्जंतुक, निर्जन, निर्जल, निर्जीव, निर्दय, निर्दालन, निर्दोष, निर्धन, निर्धार, निर्धाव, निर्धास्त, निर्धोक, निर्नायकी, निर्बंध, निर्बीज, निर्बुद्ध, निर्भय, निर्भर्त्सना, निर्भीड, निर्भेद्य, निर्मनुष्य, निर्मल, निर्माल्य, निर्मूलन, निर्लज्ज, निर्लेप, निर्लोभ, निर्वंश, निर्वात, निर्वासित, निर्वाह, निर्विकल्प, निर्विकार, निर्विघ्न, निर्विचार, निर्विवाद, निर्वीर्य, निर्वेध, निर्वैर, निर्व्यसनी, निर्व्याज.

### (४) बहिः – (बहिर्)

बहिः + गोल = बहिर् + गोल = बहिर्गोल

वरील शब्दातील विसर्गापूर्वीचा इकार ऱ्हस्व आहे. त्यामुळे विसर्ग 'र्' संधीमुळे तयार होणाऱ्या रफारयुक्त शब्दातील रफारयुक्त शब्दांपूर्वीची अक्षरे मुळातल्याप्रमाणे ऱ्हस्वच राहतील.

बहिः + गमन = बहिर् + गमन = बहिर्गमन

बहिः + गोल = बहिर् + गोल = बहिर्गोल

बहिः + मुख = बहिर् + मुख = बहिर्मुख

बहिः + वक्र = बहिर् + वक्र = बहिर्वक्र

(१) दोन अक्षरी मूळ संस्कृत शब्दांतील रफारापूर्वीच्या अक्षरांचे इकार-उकार दीर्घ असतात.

ऊर्जा, ऊर्ध्व, ऊर्मी, कीर्ती, कूर्म, चूर्ण, जीर्ण, तीर्थ, दीर्घ, दूर्वा, धूर्त, पूर्ती, पूर्ण, पूर्व, भूर्ज, मूर्ख, मूर्च्छा, मूर्त, मूर्ती, वीर्य, शीर्ष, सूर्य, स्फूर्ती.

(२) वरील दोन अक्षरी शब्दांपासून अनेक शब्द तयार होतात. असे शब्द तयार होताना मूळ दोन अक्षरी शब्दांतील रफारापूर्वीचे इकार-उकार मुळाप्रमाणे दीर्घच राहतात.

कूर्म : कूर्मगती, कूर्मावतार

जीर्ण : जीर्णज्वर, जीर्णोद्धार

वीर्य : वीर्यवान, वीर्यशाली, हतवीर्य

तीर्थ : तीर्थप्रसाद, तीर्थराज, तीथरूप, तीर्थस्वरुप, तीर्थाटन, तीर्थयात्रा, तीर्थक्षेत्र.

दीर्घ : दीर्घकालिक, दीर्घकालीन, दीर्घद्वेष, दीर्घान्त, दीर्घोत्तरी, दीर्घायू, दीर्घिका, दीर्घोद्योगी.

शीर्ष : शीर्षक, शीर्षबिंदू, शीर्षासन.

कीर्ती : अपकीर्ती, कीर्तिमंत, कीर्तीमान, कीर्तिवंत, कीर्तिवान

ऊर्जा : ऊर्जावान, ऊर्जाशक्ती,

ऊर्ध्व : ऊर्ध्वगती, ऊर्ध्वदिशा, ऊर्ध्वश्वास,

मूर्ती : बुद्धमूर्ती, राममूर्ती, मूर्तिकला, मूर्तिमंत, मूर्तिपूजा, मूर्तिकार,

पूर्व : पूर्वजन्म, पूर्वपुण्य, पूर्वपीठिका, पूर्ववृत्त, पूर्वस्थिती, पूर्वी.

(३) यांमधील बरेच शब्द मराठीमध्ये वापरले जातात, त्यामुळे असे मूळ संस्कृत ऱ्हस्वान्त शब्द सुटे लिहिताना मराठीच्या नियमाप्रमाणे दीर्घान्त लिहावे. तसेच सामासिक शब्दांत प्रथमपदी आल्यास मुळाप्रमाणे ऱ्हस्वान्त लिहावेत. मात्र या कोणत्याही शब्दांतील रफारापूर्वीच्या इकार-उकारामध्ये कोणताही फरक पडत नाही, ते मुळाप्रमाणे दीर्घच राहतात हे लक्षात ठेवावे.

**उदाहरणार्थ,**

मूर्ति (मूळ संस्कृत) मूर्ती (मराठी) सुटा लिहिताना) मूर्तिमंत (सामासिक शब्दात प्रथमपदी आल्यास) बुद्धमूर्ती (सामासिक शब्दात द्वितीयपदी/अंतिमपदी आल्यास) इकार (वेलांटी) दीर्घच असणार.

## (आ) रफारयुक्त इतर शब्दांतील अक्षरांचे इकार - उकार :

### (१) रफारयुक्त अक्षरांचे इकार-उकार-दीर्घ

निः + बीज = निर् + बीज = निर्बीज,

निः + जीव = निर् + जीव = निर्जीव,

निः + भीड = निर् + भीड = निर्भीड,

निः + मूळ = निर् + मूळ = निर्मूळ (मूळ नसलेला, मुळासकट काढणे),

निः + वीर = निर् + वीर = निर्वीर (वीर पुरुषांशिवाय). या शब्दांतील संधीने तयार झालेल्या शब्दांमधील दुसरी अक्षरे दीर्घ आहेत. उदाहरणार्थ, बीज, जीव, भीड, मूळ, वीर. 'र्' पुढील शब्दाच्या पहिल्या अक्षराला रफाराच्या रूपात जोडला जातो. तथापि, हे अक्षर मुळाप्रमाणे दीर्घच राहते; त्यामुळे तयार होणाऱ्या शब्दांतील रफारयुक्त अक्षरे दीर्घच राहतात.

**(२) रफारयुक्त अक्षरांचे इकार–उकार ऱ्हस्व :**

निः + गुण = निर् + गुण = निर्गुण,
निः+ बुद्ध = निर् + बुद्ध = निर्बुद्ध,
निः + विकार = निर् + विकार = निर्विकार,
निः + विकल्प = निर् + विकल्प = निर्विकल्प,
नि + विघ्न = निर् + विघ्न = निर्विघ्न इत्यादी.

वरील शब्दांमधील 'निः' या शब्दास संधी होऊन जोडलेल्या शब्दांतील पहिली अक्षरे मुळात ऱ्हस्व आहेत. उदाहरणार्थ,

गुण, बुद्ध, विकास विकल्प, विघ्न इत्यादी. 'निर्–' जोडताना 'र्' पुढील शब्दाच्या पहिल्या अक्षराला रफाराच्या रूपात जोडला जातो. तथापि, हे अक्षर मुळाप्रमाणे ऱ्हस्व राहते; त्यामुळे तयार होणारे रफारयुक्त अक्षर ऱ्हस्व राहते.

अपवाद : काही मूळ संस्कृत शब्दांमधील रफारयुक्त अक्षरापूर्वीची अक्षरे तसेच रफारयुक्त अक्षरे मुळात दीर्घ आहेत. त्यामुळे असे शब्द जसेच्या तसे लिहावे.

उदाहरणार्थ, कर्पूर (कापूर), शार्दूल (वाघ), शार्दूलविक्रीडित जीर्ण, तीर्थ, पूर्व इत्यादी.

**(इ)** '–इक आणि – इत' हे संस्कृत प्रत्यय धातूंखेरीज इतर तत्सम शब्दांना लागून, पररूपसंधीने विशेषणे तयार होताना शब्दांतील पहिल्या अक्षराच्या स्वराची वृद्धी होते आणि शेवटचे अकारान्त अक्षर इकारान्त होते.' हा नियम रफारयुक्त शब्दांनाही लागू होतो.

उदाहरणार्थ, –इक प्रत्यय लागून तयार होणारे शब्द : अर्थ – आर्थिक, तर्क – तार्किक, धर्म – धार्मिक, मर्म – मार्मिक, कर्म – कार्मिक,

**(ई) –इत प्रत्यय लागून तयार होणारे शब्द :**

अर्चित, अर्जित, अर्पित, ऊर्जित, गर्जित, गर्भित, गर्वित, चर्चित, मूर्च्छित, वर्जित, वर्णित, वर्तित, वर्धित, हर्षित

काही फारशी शब्दांमध्ये रफारयुक्त अक्षरे आहेत. यामध्ये रफारपूर्वीची अक्षरे ऱ्हस्व आहेत, ती मुळाप्रमाणे जशीच्या तशी लिहावीत.

**फारसी शब्द :** किर्द, खुर्द, खुर्दा, तुर्रा, तिर्री, फिर्याद, मुर्दा, मुर्दाड, बुजुर्ग.

**अरबी शब्द :** खुर्ची, खुर्मा

दूरवाणी, दूरचित्रवाणी, दूरध्वनी, दूरदर्शन, दूरस्थ, दूरदृष्टी हे शब्द अनुक्रमे दूर + वाणी, दूर + चित्रवाणी, दूर + ध्वनी, दूर + दर्शन, दूर + स्थ, दूर + दृष्टी असे दोन शब्द एकत्र येऊन जोडशब्द झाले आहेत. या शब्दांमधील दूर हा प्रत्यय नसून लांब या अर्थाचा शब्द आहे. त्यामधील 'र्' हा अर्धा नसून पूर्ण ('र') आहे. त्यामुळे तो पुढील शब्दातील पहिल्या अक्षरात रफाराच्या किंवा कोणत्याच स्वरूपात जोडला जात नाही. म्हणून दुर्वाणी, दुर्चित्रवाणी, दुर्ध्वनी, दुर्दशन, दुर्स्थ, दुर्दृष्टी असे शब्द होत नाहीत.

**टीप :**

**एक निरीक्षण :** रफार शब्दांतील पहिल्या अक्षरावर कधीही येत नाही. पहिल्या शब्दावर रफार दिल्यास त्याचा उच्चार करता येणार नाही. रफारापूर्वीच्या अक्षरावर आघात येतो. आघात येण्यासाठी रफारापूर्वी एखादे अक्षर असणे आवश्यक आहे. थोडक्यात पहिल्या अक्षरावर रफार असणारे शब्द नाहीत.

◈◈◈

# हिवाळी शाळा : एक विद्यापीठ

**डॉ. विजय बागुल**
विस्तार अधिकारी,
शिक्षण पंचायत समिती, कळवण.
भ्रमणध्वनी : ९९२२९३४९७४

विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख व कौशल्याभिमुख अध्ययन अनुभव देणे, मजुरीसाठी पालकांसोबत विद्यार्थ्यांचे होणारे स्थलांतर थांबवणे आणि स्पर्धा परीक्षा व प्रवेश परीक्षांची तयारी करून घेणे या उद्दिष्टांसाठी गेल्या सात वर्षांपासून एकही दिवस खंड




न पडता वर्षातील ३६५ दिवस व दररोज १३ तास कामकाज सुरू असलेल्या जि. प. प्राथ. शाळा हिवाळी, या शाळेने आता गावात वीज व इंटरनेट कार्यकक्षा आल्यामुळे पूर्वीपेक्षा अधिकच दिशादर्शक रूप धारण केले आहे. शहरातील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक अंगभूत कौशल्ये या अतिदुर्गम भागातील शालेय विद्यार्थ्यांनी संपादन केली आहेत. हिवाळी शाळेच्या उपक्रमात केशव गावित सरांचे शैक्षणिक व सामाजिक कामकाज, शिक्षण प्रक्रियेतील प्रत्येक घटकासाठी आदर्शवत व प्रेरणादायी आहे. या शाळेची खालीलप्रमाणे दशसूत्री.

*राज्यात अनेक शिक्षक स्वत: पुढाकार घेऊन शिक्षणामध्ये अभिनव प्रयोग करत असतात. अनेक शिक्षकांच्या अशा शैक्षणिक कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. दररोज १३ तास व ३६५ दिवस शाळा सुरू ठेवण्याचा उपक्रम सुरू असलेल्या शाळेचा दिनक्रम खूप छान आहे. १३ तासांच्या नियोजनात सकाळी योगासने, संविधानातील कलमे व पाढे पाठ करणे, सामान्य ज्ञान, स्पेलिंग पाठ करणे, कार्यानुभव, कौशल्याधारित शिक्षण, मनोरंजन, नृत्य व खेळ यांचा समावेश आहे.*

*इंग्रजी संभाषण, इंग्रजी भाषेतील गोष्टीरूप पुस्तकांचे वाचन यासाठी काही तास राखून ठेवण्यात आले आहेत. याचबरोबर भ्रमणध्वनी व प्रसारमाध्यम यांचा वापर कमी झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल झाले आहेत.*

*अशा अभिनव प्रयोगाचा गाभा या लेखात अत्यंत रोचकपणे मांडण्यात आला आहे.*

### (१) इंग्रजी संभाषण :

इंग्रजी संभाषण हा या वर्षाचा हिवाळी शाळेचा मुख्य उपक्रम आहे. दररोज तीन तास इंग्रजी अध्ययनासाठी दिले जातात. इंग्रजी भाषेतील गोष्टीरूप पुस्तके विद्यार्थी दररोज वाचतात. वाचनातून विद्यार्थ्यांना काय आकलन झाले हे विद्यार्थी पुढे येऊन व्यक्त करतात. वाचलेले आकलन न झाल्यास विद्यार्थी पुन्हा पुन्हा वाचन करतात. स्वतः आशय समजून घेतात. प्रसंगी एकमेकांची मदत घेतात. वाचनात नवीन आलेल्या शब्दांचे स्पेलिंग लिहून काढतात. स्पेलिंग पाठांतरासाठी दररोज ३० मिनिटे राखून ठेवली जातात.

### (२) गती अध्ययन :

हिवाळी शाळेत पहिली ते आठवीपर्यंतचे विद्यार्थी आहेत. इयत्ता तिसरी ते आठवीचे विद्यार्थी कोणत्याही इयत्तेचा पाठ्यांश एकत्र शिकतात. यासाठी स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून पाठ्यांशाचा व्हिडिओ पाहतात.

पाहिलेल्या व्हिडिओतून काय समजले, याचे दुसऱ्या दिवशी विद्यार्थी स्वतः सादरीकरण करतात. पाठ्यांश न समजल्यास विद्यार्थी पुन्हा व्हिडिओ पाहतात. या पद्धतीने पहिल्या सत्रातच विद्यार्थी इयत्तानिहाय व विषयनिहाय वर्षभराचा पाठ्यक्रम पूर्ण करतात.

### (३) कौशल्याधारित शिक्षण :

दररोजच्या तासिकांमध्ये बागकाम, शेतीकाम, शिलाईकाम, वीज जोडणी, बांबूकाम, स्वच्छता इत्यादी कामे मुले गटनिहाय करतात. सदर शाळेस दोन वर्गखोल्या आहेत. उपक्रमनिहाय जागा कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांनी परिसरातील उपलब्ध साहित्याचा उपयोग करून बहुकौशल्य अनुभूतीसाठी मोठा कक्ष तयार केला आहे. तासिकेनुसार विद्यार्थी या ठिकाणी नृत्याचाही आनंद घेतात.

### (४) दूरस्थ शिक्षण :

तीन वर्षांपासून हिवाळी उपक्रमात इंटरनेट कार्यकक्षा पोहोचल्यामुळे येथील विद्यार्थी माहिती-तंत्रज्ञानाचा उपयोग अध्ययनासाठी करत आहेत. एका प्रसिद्ध इंग्रजी वर्तमानपत्रात हिवाळी शाळेच्या यशोगाथेबाबतची बातमी पश्चिम बंगालमधील मैती सरांनी वाचली. मैती सरांनी हिवाळी शाळेस भेट दिली व त्यांनाही एक अविस्मरणीय अनुभव मिळाला. केशव गावित सरांना त्यांनी 'तुमच्या शाळेसाठी मी काय मदत करावी' म्हणून विचारणा केली असता, आमच्या मुलांना इंग्रजी शिकवता आल्यास उत्तम होईल अशी अपेक्षा गावित सरांनी व्यक्त केली. मैती सर प्रत्येक रविवारी या विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणाचे ऑनलाईन धडे देत आहेत. याच पद्धतीने भूगोल विषयाचेही अध्ययन अनुभव देतात. नियमित शिक्षणाबरोबरच विद्यार्थी दूरस्थ शिक्षण पद्धतीने अध्ययन अनुभव घेत आहेत.

### (५) गटकार्यातून अध्ययन :

इयत्ता पहिली ते आठवीचे वर्ग व शिक्षक दोनच. दिवसभरातील १३ तासांचे कामकाज शिस्तबद्धरीत्या सुरू असते, ते गटप्रमुखांवरील विश्वासामुळे. प्रत्येक गटप्रमुख आपल्याला दिलेली जबाबदारी पूर्ण क्षमतेनुसार पूर्ण करतात. प्रत्येक विषयाचा टास्क त्या वेळेतच पूर्ण करून घेण्याची जबाबदारी गटप्रमुख सांभाळतात. उदा., गणिताच्या एका उपघटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर त्यावर चर्चा, उदाहरणे तपासणे, अडचणी दूर करणे ही कामे दिलेल्या तासिकेतच गटप्रमुखांमार्फत पूर्ण होतात. यासाठी विद्यार्थी, शिक्षक, ग्रंथालयाची पुस्तके, स्मार्ट टीव्ही यांची आवश्यक तेथे मदत घेतात.

### (६) बाला पेंटिंग :

'Building as a learning aids' या संकल्पनेनुसार शाळेचे छत, दरवाजे, खिडक्या, बाक, भिंती इत्यादी सर्व ठिकाणी विषयानुरूप आशयाचे आरेखन व रंगकाम केले आहे. भरपूर तक्ते, कार्ड, स्वयं-अध्ययन कार्ड, नकाशे, ज्ञानरचनावादी आरेखन इत्यादी सुविधांमुळे विद्यार्थी शाळेत नेहमी अध्ययनमग्न राहण्यास मदत होते.

### (७) विद्यार्थ्यांना आव्हान देणे :

नवीन आशय, उदाहरणे, कौशल्ये शिकण्यासाठी गावित सर विद्यार्थ्यांना नियमित आव्हान देतात. यामुळेच सर्व विद्यार्थ्यांचे राज्यघटनेची कलमे, हजारपर्यंतचे पाढे पाठ आहेत. दोन्ही हातांनी लेखन, Cursive Writing इत्यादी कौशल्ये सर्व विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेली आहेत.

### (८) मूल्यसंवर्धन :

शाळेचा दिनक्रम सकाळी ७.३० वाजता योग साधनेने सुरू होतो. कौशल्याधारित उपक्रमांतून नीटनेटकेपणा,

नियमितपणा, संवेदनशीलता, श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न असतो. सायंकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमांतून आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन केले जाते.

### (९) वेळेचे व्यवस्थापन :

दररोज १३ तास व ३६५ दिवस सुरू असणाऱ्या या शाळेच्या यशाचे रहस्य म्हणजे वेळेचे उत्तम व्यवस्थापन होय. 'शाळेत दररोज व वेळेत उपस्थित राहणे हे माझ्यासाठी खूपच महत्त्वाचे आहे.' या गावित सरांच्या विधानावरून दिवसभरातील वेळेचे उत्तम व्यवस्थापन लक्षात येते. यामुळेच विद्यार्थी दिवसभर न थकता अध्ययनात कार्यमग्न असतात. दररोज शाळेत येताना व जातानाच्या वेळेतही मुलींच्या अभ्यासाचे नियोजन केले आहे. गावित सर एकूण ५० मिनिटांच्या प्रवासादरम्यान त्यांच्या मुलींकडून संविधानातील कलमे, पाढे, सामान्यज्ञान, स्पेलिंग इत्यादींचे दृढीकरण करून घेतात. यामध्ये कधीही खंड पडू देत नाहीत. या उपक्रमामुळे गावित सरांना प्रथम शाळेत येण्यासाठी व जाण्यासाठी ३० मिनिटे लागत होती. आता जास्त वेळ लागतो, असे ते आवर्जून सांगतात.

### (१०) शिक्षणातून सामाजिक बांधिलकी :

हिवाळी शाळा व आजूबाजूचा ५५ ते ६० पाड्यांचा परिसर अतिदुर्गम आहे. केवळ पावसाळ्यातील ४ महिने या परिसरात काम असते. पावसाळी पिकांव्यतिरिक्त अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही; म्हणून पालक दिवाळीनंतर या परिसरातून रोजगारासाठी स्थलांतर करतात. परिसरात पाऊस मोठ्या प्रमाणात होऊनही पिण्यासाठी पाणी मिळत नाही. यावर उपाययोजना म्हणून गावित सरांनी 'Give Welfair Trust' सोबत संपर्क साधून, परिसरातील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना लेखनसाहित्य, दप्तर, गणवेश व स्वेटर इत्यादी साहित्य प्रतिवर्षी उपलब्ध होण्याबाबत नियोजन केले आहे. तसेच या संस्थेमार्फत परिसरातील सर्व पाड्यांमध्ये जलव्यवस्थापन करण्यात आले आहे. बचतगटांना रोजगार उपलब्ध करून देऊन स्थलांतर थांबविण्यासाठीचे प्रयत्न गावित सर 'Give Welfair Trust' च्या माध्यमातून करत आहेत. शैक्षणिक कामकाजाबरोबरच शिक्षक व विद्यार्थी सामाजिक बांधिलकी जपतात.

केशव गावित सर व विद्यार्थ्यांसमवेत प्रश्नोत्तर स्वरूपात साधलेल्या शैक्षणिक संवादातून या शाळेच्या यशाचा पट उलगडतो.

**प्रश्न :** भ्रमणध्वनी व प्रसारमाध्यमांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर व वर्तनावर विपरीत परिणाम होत आहे. याबाबत तुमचे मत काय?

**गावित सर :** आमची शाळा दररोज १३ तास सुट्टी न घेता अखंड सुरू आहे. विद्यार्थी अधिक वेळ आमच्यासोबत व या शैक्षणिक वातावरणात राहतात. त्यामुळे माझ्या विद्यार्थ्यांचे अध्ययन नियमित सुरूच असते. सतत अध्ययनमग्न असल्यामुळे वर्तनाची कोणतीही समस्या आम्हांला येत नाही.

**प्रश्न :** तुमच्या शाळेत दिवसभर विविध उपक्रम सुरू असतात; मग पाठ्यक्रम कसा पूर्ण करता?

**विद्यार्थी :** विषयांच्या तासिकेला आम्ही त्या उपघटकांचे व्हिडिओ पाहतो व समजून घेतो. दुसऱ्या दिवशी व्हिडिओ पाहून ज्या विद्यार्थ्यांना घटक व्यवस्थित समजला, ते विद्यार्थी त्यानुसार सादरीकरण करतात. जर व्हिडिओ समजला नाही, तर पुन्हा पाहून आम्ही पाठ्यक्रम समजून घेतो.

**प्रश्न :** दोन्ही हातांनी लेखन व Cursive Writing हे कौशल्य विद्यार्थ्यांनी कसे आत्मसात केले?

**गावित सर :** कोविड कालावधीत मी दोन्ही हातांनी लेखन कौशल्याचा एक व्हिडिओ बघितला व मी माझ्या विद्यार्थ्यांना त्या विषयी सांगितले. तुम्ही याप्रमाणे दोन्ही हातांनी लेखनाचा सराव करा, जमते का बघा असे आव्हान दिले. विद्यार्थ्यांनी यास सकारात्मक प्रतिसाद दिला. सुरुवातीला हे कौशल्य आत्मसात करण्यात अडचणी आल्या; पण आता विद्यार्थी दोन्ही हातांनी लेखन करतात. याचप्रमाणे Cursive Writing कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केले. यादरम्यान माया शांताराम किरकिरे या विद्यार्थिनीने एकाच वेळी दोन्ही हातांनी दोन पदावलींची उदाहरणे सोडवून दाखवली. संकेत मौळे या विद्यार्थ्याने दोन्ही हातांनी अंकलेखन केले. गणेश किरकिरे या पहिलीच्या विद्यार्थ्याने Cursive Writing मध्ये स्वतःचे पूर्ण नाव लिहून दाखवले.

**प्रश्न :** दररोज १३ तास अध्ययन करताना विद्यार्थ्यांना कंटाळा येत नाही का?

**गावित सर :** दिवसभराच्या शैक्षणिक कामकाजात कौशल्याधारित शिक्षण, अवांतर कामे, कार्यानुभव, मनोरंजन, नृत्य व खेळ यांचा समावेश असल्यामुळे विद्यार्थ्यांना दिवसभरात कधीही कंटाळा येत नाही.

**प्रश्न :** तुमच्या शाळेचा दिनक्रम कसा आहे?

**विद्यार्थी :** आम्ही सकाळी ७.३० वाजता शाळेत येतो. साफसफाईनंतर प्रथम योग करतो. त्यानंतर परिपाठ, पाढे पाठांतर, स्पेलिंग पाठांतर, इंग्रजी वाचन व संभाषण, विषयानुरूप व्हिडिओ पाहणे व त्यावर चर्चा करणे, नवोदय व स्पर्धा परीक्षांची तयारी, बागकाम, नृत्य व खेळ व जेवणाआधी आत्मपरीक्षण याप्रमाणे आमचे दररोजचे नियोजन असून आम्ही ते काटेकोरपणे पाळतो.

**प्रश्न :** आत्मपरीक्षणात तुम्ही कोणता विचार करता?


**विद्यार्थी :** दिवसभरात आम्ही कोणत्या चांगल्या बाबी शिकलो, कोणत्या चुका केल्या, त्या चुका कशा टाळता येतील, उद्याचे नियोजन काय आहे, याचा विचार करतो.

**प्रश्न :** तुमच्या कामकाजावर तुम्ही समाधानी आहात काय?

**गावित सर :** सध्या तरी मी अजिबात समाधानी नाही. माझे विद्यार्थी जेव्हा शिक्षक, अधिकारी बनतील, उच्चपदावर काम करतील आणि त्यांचे यश पाहण्याची जेव्हा मला संधी मिळेल तेव्हा मी समाधानी होईन.

शंभर मॉडेल स्कूल उपक्रमांतर्गत नाशिक जिल्ह्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची अध्ययनगती वाढविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या नियोजनानुसार तालुकानिहाय शिक्षक हिवाळी शाळेस भेट देऊन या शाळेतील गुणवत्तावाढीच्या उपक्रमांचा अभ्यास करीत आहेत. निश्चितपणे नाशिक जिल्ह्यातील हिवाळी शाळा शिक्षकांसाठी विद्यापीठ म्हणून काम करत आहे.

◇◇◇



**आदिशक्ती तू, वात्सल्याची भक्ती तू,**
**झाशीची राणी तू, मावळ्यांची भवानी तू,**
**प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू,**
**आजच्या युगाची प्रगती तू...**

**जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा!!!**

# मी राबवलेला उपक्रम 'सांगा सांगा सांगा'

**श्रीनिवास मोरे**
जि. प. प्राथ. शाळा राजेवाडी,
केंद्र–भावठाणा, ता. अंबाजोगाई, जि. बीड.

*कोविड–१९ च्या संकटकाळात शाळा पूर्णपणे बंद होत्या. त्यामुळे विद्यार्थी शाळेपासून दुरावले होते. कोविडनंतर शाळा सुरू झाल्या, तेव्हा त्यांची मानसिक स्थिती लक्षात घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे, असे लक्षात आले.*

*अशा कसोटीच्या काळात राज्यातील प्रयोगशील शिक्षकांनी विविध प्रयोग राबवून विद्यार्थ्यांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी अतोनात प्रयत्न केले आहेत. त्यापैकीच 'सांगा सांगा सांगा' हा उपक्रम होय. या उपक्रमानुसार शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सोपे व साधे प्रश्न विचारून बोलते करण्याचा उपक्रम राबवला. या उपक्रमामुळे विद्यार्थी बोलते झाले. अशा अभिनव प्रयोगाची माहिती या लेखात दिली आहे.*

जून महिन्यात शाळा सुरू झाल्यानंतर माझ्या असे लक्षात आले, की विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमालीचा कमी झाला आहे. साध्या साध्या प्रश्नांची उत्तरे देतानादेखील विद्यार्थी घाबरल्यासारखे हळू आवाजात उत्तरे देतात. कोविडमुळे जवळजवळ दोन वर्षे शाळा बंद होत्या. विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहापासून दूर गेलेले होते; त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे गरजेचे होते. हे ओळखून शाळा स्तरावर 'सांगा सांगा सांगा' हा उपक्रम राबवण्याचे मी ठरवले.

'सांगा सांगा सांगा' हा उपक्रम राबवण्यासाठी पूर्वतयारी करणे आवश्यक होते. त्यासाठी मी बरीचशी माहिती कोविड–१९ च्या काळातच संकलित करायला सुरुवात केली होती. त्यासाठी एका रजिस्टरवर सर्व माहिती लिहून काढली होती व आवश्यक ती माहिती मिळताच ती अद्ययावत करत नोंदवत गेलो होतो.

### हा उपक्रम कसा राबवायचा :

हा उपक्रम राबवायचा कसा हा प्रश्न माझ्यापुढे होता, तो मी अनुभवाने सोडवला. शाळेतील प्रभुत्व पातळीच्यावरचे व प्रभुत्व पातळीपर्यंतचे विद्यार्थी निवडले. त्यांना योग्य ती कल्पना दिली. त्यांचे समुपदेशन केले व त्यांना काय पाठ करायचे आहे ते सांगितले. बिनचूक व वरच्या पट्टीत पुढे उभे राहून म्हणायचे आहे, हे निक्षून सांगितले. सर्व विद्यार्थी तयारीला लागले. जे मुद्दे व्यवस्थित वाचता येत नव्हते, ज्यांचे उच्चार करताना अडखळत होते, ते मुद्दे प्रयत्नपूर्वक योग्य उच्चार करून वाचू लागले.

### विषयांचा समावेश :

या उपक्रमात अनेकविध विषय, सामान्यज्ञान, चालू घडामोडी, ऐतिहासिक माहिती, भूगोल, सामान्य विज्ञान, इंग्रजी, कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण व आरोग्य, मूल्यवर्धन, संगीत, English Conversation Practice, पाढे पाठांतर वगैरे विषयांचा समावेश केला होता. विद्यार्थी छोट्याछोट्या प्रश्नांची उत्तरे देत होते, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होत होती.

### उदाहरणांसह प्रश्नांची रचना कशी होती :

- सांगा सांगा सांगा आपण कोणत्या गावात राहतो? – राजेवाडी
- आपण कोणत्या तालुक्यात राहतो? – अंबाजोगाई
- आपण कोणत्या जिल्ह्यात राहतो? – बीड
- आपण कोणत्या विभागात राहतो? – मराठवाडा – औरंगाबाद विभाग
- आपण कोणत्या राज्यात राहतो? – महाराष्ट्र
- आपण कोणत्या देशात राहतो? – भारत
- आपण कोणत्या खंडात राहतो? – आशिया
- आपण कोणत्या ग्रहावर राहतो? – पृथ्वी


- आपण कोणत्या मालेत राहतो? – सूर्यमालेत
- आपण कोणत्या आकाशगंगेत राहतो?– मिल्कीवे

हे प्रश्न सर्व विद्यार्थी, जो विद्यार्थी उपक्रमात भाग घेतो, त्याच्या पाठोपाठ म्हणत असल्यामुळे त्यांना ते पाठ झाले आहेत.

**उपक्रमाची सुरुवात कशी झाली :**

उपक्रमाची सुरुवात ग्रहमालेपासून केली. सुरुवातीला ग्रहांची नावे घेतली. सांगा सांगा सांगा सूर्यमालेतील ग्रहांची नावे सांगा... बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरू, शनी, युरेनस, नेपच्यून, बटुग्रह, प्लुटो अशी नावे घेतली.

नंतर आपण पृथ्वीवर येतो. पृथ्वीशी संबंधित प्रश्न विद्यार्थी सांगा सांगा सांगाद्वारे सादर करतो.




सांगा सांगा सांगा पृथ्वीवरील खंडांची नावे सांगा... खंडांची नावे सात: उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, युरोप, आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिका, सांगून झाल्यानंतर पुढचा प्रश्न महासागरांविषयी.

सांगा सांगा सांगा महासागरांची नावे सांगा... महासागरांची नावे पाच : पॅसिफिक महासागर, अटलांटिक महासागर, हिंदी महासागर, दक्षिण महासागर, आर्टिक महासागर.

सांगा सांगा सांगा जगातील सर्वांत मोठ्या नद्या सांगा... नाईल नदी, अमेझॉन नदी, मिसीसीपी नदी, यांगसे नदी, होअँगओ नदी, ओबोनदी कांगो नदी, गंगा नदी इत्यादी.

जगातील महत्त्वाचे देश व त्यांच्या राजधान्या सांगण्याच्या दृष्टीने ज्या विद्यार्थ्याला ते पाठ करायला दिले आहे, तो म्हणतो, 'सांगा सांगा जगातील महत्त्वाचे देश व त्यांच्या राजधान्या सांगा... कॅनडाची राजधानी–ओटावा, अमेरिकेची राजधानी–वॉशिंग्टन डीसी, मेक्सिकोची राजधानी–मेक्सिको, सिटी कोलंबोची राजधानी–बोगोटा, पेरूची राजधानी–लिमा, चिलीची राजधानी–सेंटीयागो, ब्राझीलची राजधानी–ब्राझीलिया, अर्जेंटिनाची राजधानी – ब्युनॉसआयर्स, इंग्लंडची राजधानी–लंडन, फ्रान्सची राजधानी–पॅरिस, जर्मनीची राजधानी–बर्लिन, स्पेनची राजधानी – मदींद्र, पोर्तुगालची राजधानी–लिस्बन, रशियाची राजधानी मास्को, मंगोलियाची राजधानी उलन बटोर, चीनची राजधानी–बीजिंग, जपानची राजधानी–टोकियो, बांगलादेशची राजधानी–ढाका, भारताची राजधानी – नवी दिल्ली, पाकिस्तानची राजधानी–इस्लामाबाद, अफगाणिस्तानची राजधानी–काबुल, इराणची राजधानी तेहरान, इराकची राजधानी–बगदाद, सौदी अरेबियाची राजधानी रियाद, इजिप्तची राजधानी–कैरो, ऑस्ट्रेलियाची राजधानी–कॅनबेरा अशी म्हणून घेतली.

विद्यार्थ्यांकडून भारतीय संघराज्ये, केंद्रशासित प्रदेश व त्यांच्या राजधान्या पाठ करून घेतल्या. भारतातील प्रमुख नद्या, पर्वतरांगा, भारतातील प्रमुख शहरे, त्यानंतर महाराष्ट्रातील जिल्ह्यांची नावे, ३६ जिल्ह्यांची नावे पाठ करून घेतली. आता बीड जिल्हा तालुके ११, बीड जिल्ह्यातील नऊ नद्यांची नावे अशाच प्रकारे पाठ करून घेतली.

**फलश्रुती :**

विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा आत्मविश्वास वाढला. भारताचे राष्ट्रपती ते गावच्या सरपंचांपर्यंत, गणमान्य व्यक्तींची नावे पाठ करून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात आपल्यालाही काही तरी येते, ही भावना निर्माण झाली. अशाप्रकारे या उपक्रमामुळे माझ्या शाळेतील मुले नवीन आव्हानाला सामोरी गेली आहेत.

◇◇◇

# मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या योजना

डॉ. द. वि. चिक्करमने

जीवन शिक्षण अंक जानेवारी – १९६० मधील लेख

**(जीवन शिक्षण जानेवारी, २०२३ मधून पुढे चालू)**

'आमचे खेडे' ही नमुना–कृती घेऊ. आपल्या खेड्याविषयी सर्व तऱ्हेची माहिती रस्ते, तलाव, देवालये, ऑफिसेस्, डोंगर, उद्योगधंदे इत्यादींविषयी जाणण्याची मुलांना उत्सुकता असते. महत्त्वाच्या स्थळांना मुलांनी भेटी दिल्या असता, ही माहिती त्यांना मिळू शकते. स्थळांना भेटी देऊन आल्यानंतर मुले ही स्थळे नकाशात भरू शकतील. गावाची शाळा, देवालय, दवाखाना, तळे, पोस्ट ऑफिस, चावडी आणि महत्त्वाचे रस्ते किंवा गल्ल्या मुले पाहू शकतील. या कृती–नमुन्यानंतर 'आमचा तालुका, आमचा जिल्हा' हा कृती–नमुना घेता येईल. हा नमुना इयत्ता दुसरी किंवा तिसरी या इयत्तेत घेणे योग्य होईल. इयत्ता चौथी मध्ये 'आमचे राज्य' हा कृती–नमुना घेता येईल. वर्गातील मुले तालुक्यातील वेगवेगळ्या गावातून आलेली असतात. काही मुले इतर तालुक्यांतील व काही इतर जिल्ह्यांतून आलेली असतात. ही सर्व स्थळे नकाशात दाखवावयाची. निरनिराळ्या ठिकाणांहून येणारी मुले, घरापासून शाळेत येताना आपण कोणत्या वाहनाने येतो; हे सांगतील मग ते वाहन मोटार, आगगाडी वा बैलगाडी असो किंवा कोणत्याच वाहनाचा आश्रय न घेता पायी पायीच शाळा गाठावी लागते असेही मुले सांगतील. मुले बस स्टँडला भेट देतील. तेथील नावाच्या पाट्या वाचतील, रस्ते मार्गांचा मागोवा घेतील आणि मग तालुक्यातील इतर शहरांशी आपले गाव कसे जोडले गेले आहे, याचा त्यांना अंदाज येईल. मुले रेल्वे स्टेशनला (असल्यास) भेट देतील व आगगाडीने तालुक्यातील व जिल्ह्यातील कोणकोणत्या गावांना व शहरांना जाता येते, त्याची माहिती मिळवतील. नंतर तालुक्याच्या नकाशात रस्ते–मार्ग, रेल्वे मार्ग भरतील. तालुक्यातील वेगवेगळ्या गावाहून आलेली मुले आपापल्या गावातील उत्पन्नाची माहिती सांगतील. काही ठिकाणी कापूस पिकत असेल, काही ठिकाणी भुईमूग अमाप पिकत असेल, काही ठिकाणी गहू, काही ठिकाणी भात आणि काही ठिकाणी ऊस इत्यादी पिके येत असतील. काही गावातून ग्रामोद्योग सुरू झाला असेल. ही सर्व माहिती मुले तालुका व जिल्हा यांच्या नकाशात भरतील. मुले बाजाराला भेट देतील व निरनिराळ्या गावांहून येणारा भाजीपाला, धान्ये, दूध आणि इतर गरजेचे पदार्थ यांचे निरीक्षण करतील. याप्रमाणे मुले तालुक्यातील उत्पादन, व्यापार, नगरे व शहरे यांना जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा इत्यादींचे ज्ञान मिळवितील. ही सर्व माहिती 'आमचा तालुका, आमचा जिल्हा' हा कृती नमुना करताना मुले शिकतील.

जेव्हा आपण जिल्हा–पातळीला येतो, तेव्हा कृती–नमुन्यांचे क्षेत्रही विस्तृत होते. वृत्तपत्र वाचन हे एक मुलांच्या दैनंदिन जीवनाचा भाग होऊन राहिलेले असते. जिल्ह्यासंबंधीची वार्ता वाचून ती त्यांना जिल्ह्याच्या नकाशात भरता येईल. राज्यांतील अगर देशातील महत्त्वाच्या बातम्या वर्गात वाचल्या जातील आणि मग जिल्ह्याच्या अगर देशाच्या नकाशात बातमी स्थळे भरली जातील. गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देश यांचे मुबलक आराखडे संग्रही असले पाहिजेत. म्हणजे मग त्यामध्ये इच्छित स्थळे व माहिती भरता येईल. वृत्तपत्रांतील चित्रे व लेख कापून घेऊन मोठमोठ्या विकास योजनांचा सचित्र संग्रह करता येईल. अशा कृती–नमुन्यांमुळे भूगोल वास्तववादी बनेल.

'स्वच्छता करूया अन् निरोगी होऊया' हा सर्व शाळांनी करण्यासारखा एक कृती–नमुना होईल. यामध्ये खालच्या वर्गापासून थेट वरच्या वर्गापर्यंत सर्व वर्ग सामील होतील. आरोग्य आणि स्वच्छता यांचा परस्पर संबंध मुले जाणू शकतील. वर्ग, आवार, मुताऱ्या, संडास, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व वापर इत्यादींची स्वच्छता कशी ठेवता येईल, हे मुलांना कळून चुकेल. तद्वत्च दररोज स्नान करणे, दात घासणे, डोळे स्वच्छ करणे, नाक साफ करणे, नखे साफ करणे इत्यादी वैयक्तिक स्वच्छतेबद्दल मुले जागरूक राहतील. घाणीमुळे रोग कसे पसरतात आणि खराब पाण्यामुळे संसर्गजन्य रोग कसे होतात, याची माहिती त्यांना होईल. भरपूर प्रकाश, मोकळी हवा आणि उकिरड्याची योग्य प्रकारे वासलात याचे महत्त्व मुलांना पटेल. या कृती–नमुन्यांचे जोडीला 'आपण चांगले वागू या' हा कृती नमुना घेता येईल. यामुळे मुले वागण्याच्या चांगल्या पद्धती शिकतील, वडीलधारी मंडळी व गुरुजन यांच्याविषयी आदर दाखवतील, मित्रांचे अगत्याने स्वागत करतील. शेजारीपाजारी यांना त्रास देणार नाहीत, वर्गात व बाहेरही टापटीपीने वागतील. धसमुसळेपणाने मध्येच घुसण्याऐवजी आपली पाळी येईपर्यंत थांबतील, ही ध्येये आहेत. हळूहळू ती आत्मसात करीत गेले पाहिजे. पूर्णपणे आत्मसात झाल्यावर त्यांचे रूपांतर सवयींमध्ये होईल.

वर्गव्यवस्था पाहण्यासाठी मंत्रिमंडळ स्थापने, हा एक असाच दुसरा साधा, सोपा कृती–नमुना आहे. प्रत्येक वर्ग आपले मंत्री निवडतील. वर्गाच्या संमतीने काही वेळा शिक्षकच मंत्री नियुक्त करतात. प्रत्येक मंत्र्यावर वेगवेगळी जबाबदारी टाकलेली असते. वर्गाची स्वच्छता, आरोग्य याची जबाबदारी एका मंत्र्यावर असेल, तर शाळेच्या आवाराची जबाबदारी दुसऱ्यावर असेल. प्रार्थनेची व्यवस्था करणे ही जबाबदारी एकावर असेल, तर पाणीपुरवठ्याची जबाबदारी दुसऱ्यावर असेल; याप्रमाणे निरनिराळ्या मंत्र्यांवर खेळ, नाट्य, वार्तालेखन, इत्यादींपैकी एकेक जबाबदारी असेल. अशा प्रकारे जबाबदारी घेऊन ती पार पाडण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळते व तो समाजसेवक बनतो. या कृती–नमुन्यावरून लोकशाही पद्धतीने खेडेगावचा कारभार ग्रामपंचायतीमार्फत, जिल्ह्याचा कारभार जिल्हा बोर्डामार्फत, राज्याचा कारभार विधानसभेमार्फत व देशाचा कारभार लोकसभेमार्फत कसा चालविला जातो, याचा सूक्ष्म अभ्यास मुलांना करता येईल. प्रत्येक महिन्याला वर्गमंत्री बदलतात. त्यामुळे वर्गातील प्रत्येक मुलाला मंत्री होण्याची किमान एकदा तरी संधी मिळते आणि काहींना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळते.

**(क्रमश:)**

'जीवन शिक्षण' हे मासिक, संचालक तथा संपादक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यासाठी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छपाई करून प्रकाशक तथा संचालक, कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक.

'Jeevan Shikshan' a monthly magazine owned by State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune printed at Runa Graphics, behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411041 and published by Director, Kaustubh Diwegaonkar (I.A.S.) at State Council of Educational Research and Training, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Kaustubh Diwegaonkar (I.A.S.), Director.

## इतिहासाच्या पानांवरून

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

# महिलांचे पहिले ट्रेनिंग कॉलेज

पुण्यात १८६५ मध्ये पुरुष शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले. १८६९ मध्ये त्यामध्ये महिलांसाठी एक वर्ग सुरू केला. त्याच्या पुढच्याच वर्षी १८७० मध्ये फिमेल ट्रेनिंग कॉलेज सुरू करण्यात आले. त्याच्या पहिल्या सुपरिटेंडेन्ट मिसेस मिचेल या होत्या. बुधवार पेठेतील छबीलदास यांच्या वाड्यात हे कॉलेज सुरू झाले. मुली वाड्याच्या परिसरातच नातेवाईकांसह खोली करून राहत. त्यांना महिन्याला आठ रुपये स्कॉलरशिप मिळत असे. त्या काळात शिक्षकांचा पगार साधारण तेवढाच होता. बारा वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना कॉलेजमध्ये प्रवेश मिळत असे. चार वर्षांचा कोर्स होता. पहिल्या दोन वर्षांत विषयाचे ज्ञान, त्यानंतर अध्यापन कसे करावे याचे ज्ञान दिले जात असे.

१८८० मध्ये कॉलेज अभ्यंकराच्या वाड्यात गेले. त्यानंतर १८९० मध्ये ते किबे वाड्यात आले. आता जिथे प्रभात टॉकीज आहे, तिथे पूर्वी किबेवाडा होता. या काळात मुलींची राहण्याची व्यवस्था हुजूरपागेत केली होती. त्या वेळी तबेल्याचे रूपांतर खोल्यांत केले होते. तिथेच पाठासाठीचे मुलींचे प्रॅक्टिसिंग स्कूल नंतरच्या काळात सुरू करण्यात आले. प्राध्यापक पहिल्यांदा पाठ घेऊन दाखवत, नंतर त्याप्रमाणे प्रशिक्षणार्थींना पाठ घ्यावे लागत. मुलींचे हे कॉलेज १९१६ मध्ये सेंट्रल बिल्डिंग शेजारच्या आगाखान बंगल्यात हलवले, तर १९२७ पासून ते लाल देवळासमोरच्या यलो रोज बंगल्यात सुरू झाले. त्या ठिकाणी सध्या शासकीय परीक्षा मंडळाचे कार्यालय आहे.

स्वातंत्र्यापर्यंत कॉलेजच्या सर्व सुपरिंटेंडेन्ट या इंग्रज महिला होत्या. १९४७ नंतर पहिल्यांदाच सौ. सुधा अत्रे या पहिल्या भारतीय सुपरिंटेंडेन्ट झाल्या.

१९१५ ते १९२७ या काळात महिला ट्रेनिंग कॉलेजने कन्याशिक्षक या नावाने मासिक चालविले. दुर्दैवाने त्याचे अंक उपलब्ध नाहीत. दरवर्षी कॉलेजचा वार्षिक उत्सव होत असे, त्यामध्ये मुली सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत. नाटक बसवत. मुलींनी बनवलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरवले जात असे. वेळोवेळी त्याचे वृत्तांत मराठी शिक्षक या मासिकात प्रसिद्ध झालेले दिसतात. साधारण ९० वर्षांनंतर हे कॉलेज बंद पडले. १८९० ते १९६० या काळात 'फिमेल एज्युकेशन सोसायटी'ने हे कॉलेज चालवले होते. महाराष्ट्रातील शिक्षिका घडवणारे पहिले ट्रेनिंग कॉलेज होते.



‘रस्ते सुरक्षिततता’ या विषयावर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस प्रशासनातर्फे मार्गदर्शन कार्यशाळा दि. ८ मार्च, २०२३.



सामाजिक शास्त्रे विभागांतर्गत ८ मार्च, २०२३ रोजी महिला दिनानिमित्त राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे ‘स्त्री-पुरुष समता शिकविताना’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्याख्याते म्हणून गीताली विनायक मंदाकिनी, संपादक - ‘मिळून साऱ्याजणी’ (मासिक), परिषदेच्या उपसंचालक डॉ. नेहा बेलसरे, डॉ. सागर व्हटकर समवेत श्रीम. रत्नप्रभा भालेराव, श्री. सचिन चव्हाण, डॉ. निता जाधव व परिषदेतील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



एनपावर निर्मिती उद्योजकीय मानसिकता विकसन अखेरीस आदर्श शाळा अंतर्गत राज्यस्तरीय प्रदर्शनाचे आयोजन VGPG विभागामार्फत दि. ८ मार्च, २०२३ रोजी करण्यात आले. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करताना परिषदेच्या उपसंचालक डॉ. नेहा बेलसरे, डॉ. सागर व्हटकर समवेत प्रशासन अधिकारी डॉ. दिपक माळी, राज्य समन्वयक श्री. श्याम राऊत इ. उपस्थित होते.

Date of Publication 3 March 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th March 2023
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील प्रसारमाध्यम विभागाकडून प्रकाशित होणाऱ्या 'जीवन शिक्षण' या मासिकास दि. १३ मार्च, २०२३ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्थेकडून कै. जानकीबाई केळकर स्मृतिप्रीत्यर्थ उत्कृष्ट बालवाङ्मय दिवाळी अंक तसेच शिक्षणक्षेत्रातील १६१ वर्षांच्या गौरवशाली परंपरेबद्दल पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. सदर पारितोषिक स्वीकारताना परिषदेच्या उपसंचालक डॉ. नेहा बेलसरे, डॉ. कमलादेवी आवटे, प्रसारमाध्यम विभागाचे विभागप्रमुख श्री. अरुण सांगोलकर, सेवापूर्व विभागाचे सहसंचालक श्री. नामदेव माळी, प्रशासन अधिकारी डॉ. दिपक माळी, अधीक्षक सलिल वाघमारे, सुप्रसिद्ध साहित्यिक राजन खान, मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, वि. दा. पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ____________
____________
____________
____________